म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ४६५
REFBK-0004083

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ४६५

# राजकीय विचार.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६२५८९
ठाणे,

. ग. प्रधान.

# प्लेटो व त्याचे राजकीय विचार.

लोकमत

सं.मि. ३०

लेखक :

रामचंद्र गणेश प्रधान बी. ए., एलएल. बी., ॲड्व्होकेट, लोकनियुक्त सभासद, मुंबई कायदेकौन्सिल; फेलो, मुंबई युनिव्हर्सिटी.

ग्रंथकार, प्रातिनिधिसत्ताक राज्यपद्धति; भारतसेवकांतील निवडक लेख व हिंदुस्थानांतील स्वराज्याचा लढा ( इंग्रजी )

REFBK-0004083

पुणें पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व रामचंद्र गणेश प्रधान बी. ए., एलएल. बी., ॲड्व्होकेट, यांनीं नाशिक येथें प्रसिद्ध केलें.

१९३०.

किंमत ६ आणे.

8063

# स्वराज्यग्रंथमाला.

—०○०—

पुष्प १ लें:—प्रातिनिधिसत्ताक राज्यपद्धति. पहिल्या आवृत्तीच्या फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत. दुसरी आवृत्ती छापत आहे. किंमत १ रुपया.

पुष्प २ रें:--India's Struggle for Swaraj ( हिंदुस्थानांतलि स्वराज्याचा लढा ) हा ग्रंथ इंग्रजींत आहे. किंमत ४ रुपये.

पुष्प ३ रें:—देशसेवा अथवा **भारतसेवकां**तील निवडक लेख. किंमत ३ रुपये.

पुष्प ४ थें:--प्लेटो व त्याचे राजकीय विचार. किंमत ६ आणे.

पुष्प ५ वें:--रूसो व त्याचे विचार ( तयार होत आहे. )

हीं सर्व पुस्तकें ग्रंथकर्ते आमदार रा. ग. प्रधान यांच्याकडे नाशिक येथें मिळतील.

# प्रस्तावना.

सुमारें पंधरा वर्षांपूर्वी हा निबंध मीं पुणें येथील वसंतोत्सवव्याख्यानमालेंत वाचिला. तो पुस्तकरूपानें मी प्रसिद्ध करीत आहें. हिंदी लोक आतां 'राजकीय प्रवृत्तिपर' (politically minded) झाले आहेत, व राजकीय ज्ञान संपादन करण्याची त्यांची इच्छा बरीच वाढली आहे, यांत शंका नाहीं. अशा वेळीं हा लहानसा निबंध बोधप्रद झाल्यावांचून राहणार नाहीं, असा माझा दृढ विश्वास आहे. आपले लोकांना प्रमुख राजकीय तत्ववेत्त्यांचे विचार माहीत होणें अत्यंत अवश्य आहे.

नाशिक,
ता. १ मे १९३०.

ग्रंथकर्ता.

प्र.नं ३०
४०७

# प्लेटो व त्याचे राजकीय विचार.

गेले सालीं वसंतोत्सवव्याख्यानमालेंत माझें ' ब्रिटिश वसाहतींतील स्वराज्य ' ह्या विषयावर व्याख्यान झालें. व्याख्यानाचे शेवटीं राजकारणशास्त्राचें ( Political Science ) महत्व किती आहे हें सांगून या शास्त्राच्या अध्ययनाचा प्रसार करण्याकरितां संस्थांच्या द्वारें व अन्य रीतीनें प्रयत्न करणें जरूर आहे, असें मीं सांगितलें; व पुण्यांतील विद्वान् सद्गृहस्थांनीं अशा रीतीनें प्रयत्न करावा अशी मीं त्यांना विनंति केली. ही माझी विनंति अद्याप सफल झालेली दिसत नाहीं. तथापि "**लोकां सांगें ब्रह्मज्ञान। आपण कोरडे पाषाण॥**" ह्या दोषास आपण पात्र होऊं नये म्हणून, माझ्या सूचनेप्रमाणें राजकीय शास्त्राच्या अध्ययनाचा प्रसार करण्याचे कामीं संकलित प्रयत्न होवोत किंवा न होवोत, आपण एकट्यानेंच शक्य तो प्रयत्न करावा असा हेतु मनांत धरून मी सर फ्रेड्रिक पॉलॉक ह्या ग्रंथकर्त्याचें " राजकीय शास्त्राची प्रस्तावना, " हें पुस्तक वाचावयास घेतलें. ह्या लहानशा पुस्तकांत प्लेटोपासून तों अर्वाचीन कालापर्यंत जे मोठमोठाले राजकीय तत्ववेत्ते युरोपांत होऊन गेले त्यांच्या राजकीय विचारांचा अगदीं संक्षिप्त रीतीनें इतिहास दिलेला आहे. प्लेटोविषयीं ह्या ग्रंथांत जें लिहिलें आहे तें अगदींच त्रोटक असल्यामुळें, त्याचे राजकीय विचार सविस्तर रीतीनें जाणण्याची मला इच्छा झाली, व नंतर प्लेटोचे राजकीय विषयावरील मूळ ग्रंथ व त्यासंबंधानें टीकात्मक ग्रंथ मीं वाचले. हा निबंध ह्या अध्ययनाचें लहानसें फळ होय.

" मानवी प्रगति समुद्राच्या भरतीओहटीप्रमाणें आहे, " असें एके ठिकाणीं लॉर्ड मेकाले ह्या ग्रंथकारानें म्हटलें आहे. समाजाची सतत अव्याहत रीतीनें उन्नति होत नाहीं, कधीं उन्नति तर कधीं अधोगति होत जाते, हा इतिहासाचा सिद्धांत इतका स्पष्ट आहे कीं, तो नाकबूल करणें म्हणजे इतिहासाचें अज्ञान व्यक्त करणें होय. हा जो चक्रनेमिक्रम त्याचें अंतिम पर्यवसान अचल उन्नतींत किंवा अचल अधोगतींत होणार हा मोठा प्रश्न आहे. त्याबद्दल तत्ववेत्त्यांत मतैक्य आढळत नाहीं. लॉर्ड मॉर्ले साहेबांनीं आपल्या 'इतिहास व राजकारण ह्या संबंधानें काहीं टीका' ह्या पुस्तकांत या प्रश्नाचा निर्णय करण्याचा प्रयत्न केला

आहे. ते असें म्हणतात कीं, प्रगति हा दिक्कालाबाधित असा नियम नाहीं. सर्व समाजांची सर्व काळीं एकसारखी प्रगति होत नाहीं. ( A universal law, for all times, all states, all societies, Progress is not ). परंतु हा लॉर्ड मॉर्लेसाहेबांचा निर्णय समाधानकारक आहे, असें म्हणतां येणार नाहीं. कारण, मानवी समाजांतलि एखाद्या विशिष्ट भागाची सतत प्रगति होत आहे किंवा नाहीं हा प्रश्न नसून एकंदर सर्व मानवी समाजाची प्रगति होत आहे कीं काय, हा प्रश्न आहे. बाल्फरसाहेबांच्या मतें मनुष्यजाति प्रगतिरूपी उच्च, शीतल व सुखमय अशा गिरिवर आरोहण करीत नसून अधोगतिरूपी दऱ्याखोऱ्यांतच घसरत चालली आहे. मनुष्यजातीची प्रगति होत चालली आहे व प्रगतीच होत जाणार, हें मत १९ व्या शतकांत इंग्लंडांत बरेंच प्रचलित होतें. परंतु अलीकडे त्याचें प्राबल्य कमी झालेलें असून कित्येकजण असें स्पष्टपणें म्हणत आहेत कीं, मनुष्यसमाज केव्हांना केव्हां तरी पूर्णावस्थेस पोंचेल अशी भ्रामक आशा बाळगून समाजाचे ठायीं पूर्णत्व आणण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आपल्या अल्प आयुष्याचा अपव्यय करणें होय. असो. एकंदरींत हा प्रश्न बराच वादग्रस्त आहे. तथापि, **यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥ अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहं ॥** ह्या श्रीमद्भगवद्गीतेंतील उक्तींत कांहीं तथ्य असेल, तर मनुष्यजाति पूर्णत्वास पोंचो किंवा न पोंचो, तिची एकंदरींत गति प्रगतीकडे असली पाहिजे असें वाटतें. तें कसेंही असो, समाज अधोगतीस चालला असतां त्या अधोगतीस आळा घालून त्यास आपल्या विचारशक्तीनें किंवा आचारशक्तीनें पुनरपि सन्मार्गास प्रवृत्त करण्याकरितां ज्या महान् विभूतींनीं आजपर्यंत प्रयत्न केले आहेत त्या विभूती कोणत्या एका विशिष्ट देशाच्या किंवा कालाच्या नसून त्या सर्व मनुष्यजातीच्या व सर्व कालाच्या होत. कोठें ग्रीस देश व कोठें आपली भरतभूमि! कोठें ख्रिस्ती शकापूर्वीचें पांचवें शतक, व कोठें हें ख्रिस्ती शकानंतरचें २० वें शतक! एवढें जरी दिक्कालाचें महदंतर आहे, तरी प्लेटोसारख्या महान् तत्त्ववेत्यांच्या विचारांत अशी कांहीं जादु भरलेली असते कीं, तिचा परिणाम सर्व देशांवर व सर्व कालावर कमी जास्त प्रमाणानें झाल्याशिवाय राहात नाहीं. प्लेटोच्या विशाल बुद्धिमत्तेनें अध्यात्मिक, नैतिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक वगैरे शेंकडों गूढ प्रश्नांचें असें कांहीं आकलन केलेलें आहे कीं, शंकराचार्य, अरिस्टा-

टल, कॅन्ट, स्पिनोझा, काम्ट, स्पेन्सर वगैरे प्राचीन व अर्वाचीन प्रचंड तत्त्ववेत्त्यांच्या मालिकेंत इतिहासकार त्याची जी गणना करितात ती अगदीं यथायोग्य आहे. त्याच्या विचारांचा परिणाम युरोपियन राष्ट्रांचे संस्कृतीवर तर प्रचंड झालेला असून अद्यापिही होत आहे. त्याच्या सर्व ग्रंथांचें सर्व प्रमुख पाश्चात्य भाषांत भाषांतर झालें असून त्यावर टीकात्मक ग्रंथ इतके आहेत कीं, त्यांचें एक चांगल्या प्रतीचें पुस्तकालय होईल. त्याच्या राजकीय, सामाजिक व शिक्षणविषयक विचारांचा परिणाम सिसरो, सेंट ऑगस्टिन, सर टॉमस मूर, मिल्टन, लॉक, रूसो, जीन पॉल, गेअथी इत्यादि सरस्वतीमंदिरांत प्रकाशणाऱ्या रत्नांच्या विचारतेजावर झालेला आहे. राजकारण, तत्त्वज्ञान व वाङ्मय ह्या विषयांवरील त्याचे विचार अतिशय उदात्त असून, सर्व ज्ञानाचें ऐक्य ( Unity of Knowledge ), कायद्याचें साम्राज्य ( Reign of Law ), शिक्षणाची योग्यता, स्त्रीपुरुषांची समता, इत्यादि जे अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांचे व मुत्सद्यांचे सिद्धांत ते त्याच्या ग्रंथांत आढळून येतात. अशा ह्या थोर ग्रीक तत्त्ववेत्त्याचे राजकीय विचार काय आहेत, व त्यापासून आपणास हल्लींचे स्थितींत काय बोध घेण्यासारखा आहे, हें दाखविण्याचा प्रस्तुत निबंधांत यथाशक्ति प्रयत्न केला आहे.

## प्लेटोचें चरित्र.

प्लेटोचे राजकीय विचार सांगण्यापूर्वी त्याचा जीवनवृत्तांत थोडक्यांत सांगणें जरूर आहे. प्लेटोचा जन्म खिस्ती शतकाचे पूर्वी ४२७ वें वर्षी मे महिन्यांत ग्रीस देशांतील येजायना ( Ægina ) ह्या बेटांत झाला. त्याचें घराणें फार पुरातन असून कुलीन होतें. त्याचें लहानपणचें शिक्षण त्या वेळच्या ग्रीक पद्धतीप्रमाणें झालें. सुंदर शरीरांत सुंदर आत्मा, हें प्राचीन ग्रीक लोकांचें ध्येय असे. ( A beautiful soul in a beautiful body ) व त्याप्रमाणें मुलांना उत्तम शारीरिक व नैतिक शिक्षण देण्याबद्दल ते अतिशय काळजी घेत असत. तसेंच सर्व व्यक्ती राष्ट्राकरितां होत, राष्ट्राव्यतिरिक्त स्वतंत्र व्यक्तिजीवन नाहीं, अशी त्यांची दृढ समजूत असल्याकारणानें प्रत्येकानें राजकारणांत पडून आपआपल्या बुद्ध्यनुरूप व सामर्थ्यानुरूप राष्ट्रसेवा केली पाहिजे, त्याशिवाय त्याची आत्मिक उन्नति होणार नाहीं, असें त्यांच्या राष्ट्रीय शिक्षणाचें व एकंदरींत राष्ट्रीय व्यवस्थेचें धोरण होतें. तालिमेचे सर्व प्रकार, युद्धकला, मर्दुमकीचे खेळ व वाङ्मय

ह्या सर्वांत प्लेटोनें लवकरच प्रावीण्य संपादन केलें. होमर, हीसीयड इत्यादि प्राचीन कवींचीं काव्यें त्यानें पठन केलीं; इतकेंच नव्हे तर, त्यानें स्वतः कांहीं काव्यें रचिलीं व एक शोकपर्यवसायी नाटक लिहिलें. प्लेटो वीस वर्षांचा झाला, तेव्हां त्याच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडली. ती ही कीं त्याचा साक्रेटिसाशीं परिचय जडला. साक्रेटिसाचे उदात्त विचार व त्याचें उज्ज्वल चारित्र्य प्लेटोस फारच आवडत असे; व तो साक्रेटिसास गुरु मानून त्यावर नरम-निष्ठ शिष्याप्रमाणें अत्यंत प्रेम करी. साक्रेटिसाचे राजकीय, नैतिक वगैरे विषयांवरील विचार ॲथीनियन लोकांत प्रचलित असलेल्या विचारांहून भिन्न होते; व तो ते विचार कोणाचीही भीडमुरवत न धरतां निर्भीडपणें व्यक्त करीत असे. रस्त्यांत, बाजारांत, तालमींत जेथें जेथें म्हणून चार लोक जमलेले असतील, तेथें तेथें जाऊन त्यांच्यांशीं संवाद करून, त्यांच्या समजुती किती चुकीच्या आहेत, हें तो दाखवीत असे. आपणांस ज्ञानी म्हणविणारे लोक खरोखर अज्ञ आहेत; ज्यांच्या हातांत राज्यकारभार आहे, ते खरेखुरे राज्यकर्ते नसून भोंदू आहेत; त्यांना राज्यकला अवगत नाहीं, व त्यामुळें ॲथेन्सची राज्य-व्यवस्था दूषित झाली असून राज्यकलेचें उद्दिष्ट जें नागरिकांच्या सद्गुणांची अभिवृद्धि तें सफल होत नाहीं, असें तो वारंवार लोकांना निर्भीडपणें सांगत असे. अशीं स्वतंत्र विचाराचीं माणसें सर्वांना प्रिय होणें शक्य नाहीं, व साक्रेटिसाच्या निर्भीडपणाच्या वर्तणुकीमुळें त्याचा कांहीं लोक व विशेषतः राज्यकर्ते द्वेष करूं लागले. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी ४०४ या सालीं ॲथेन्स नगरांत राज्यक्रांति झाली व त्यामुळें तेथें प्रचलित असलेल्या प्रजास-त्ताक राज्यपद्धतीचा नाश होऊन सर्व सत्ता तीस प्रमुख माणसांच्या हातीं आली. ह्या राज्यक्रांतीनें ॲथिनीअन् लोकांची राज्यव्यवस्था चांगली होऊन, त्यांचें कल्याण होईल अशी प्लेटोस फार आशा होती. परंतु जेव्हां ह्या तीस सत्ताधी-शांनीं साक्रेटिसाचा छळ करण्यास आरंभ करून त्याची मुस्कटदाबी केली, व त्यास आपले विचार उघड रीतीनें व्यक्त करण्याची मनाई केली, इतकेंच नव्हे तर त्याचा कांहीं खुनांशीं विनाकारण संबंध जोडण्याचा प्रयत्न केला, तेव्हां प्लेटोची अतिशय निराशा झाली. पुढील सालीं ॲथेन्स नगरांत पुन्हा राज्यक्रांति होऊन सद्-रहू तीस सत्ताधीशांचा बीमोड झाला व प्रजासत्ताक राज्यपद्धतीची पुनरपि स्थापना झाली. आतां तरी आपल्या गुरूचा छळ होणार नाहीं, अशी प्लेटोस फार आशा

वाटत होती. परंतु नवीन राजकर्त्यांनीं साक्रेटिसाचा अधिकच छळ केला. साक्रेटिस तरुणांचीं मनें बिघडवितो, व तो राष्ट्रीयदेव मानीत नाहीं, असा त्याच्यावर खोटाच आरोप करून त्यास देहान्तशिक्षा दिली; व त्याप्रमाणें इसवी सनापूर्वी ३९९ सालीं साक्रेटिसाचा विषप्राशनानें अंत झाला.

आपल्या गुरूचा असा विनाकारण छळ झालेला पाहून, प्लेटोस अतिशय दुःख झालें, व जोंपर्यंत अॅथेन्स नगराच्या राज्यव्यवस्थेंत असल्या दुष्ट लोकांचें प्राबल्य आहे, तोंपर्यंत आपल्यासारख्यांनीं राज्यकारभारांत पडल्यानें फायदा न होतां, उलट नुकसानच होईल असें त्यास वाटून, राजकारणांत पडून देशसेवा करण्याची त्याची जी महत्त्वाकांक्षा होती, ती त्यानें सोडून दिली; व तेव्हांपासून तत्त्वज्ञानाची एकनिष्ठपणानें सेवा करण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें कांहीं वर्षे ईजिप्त, इटली, सिसिली, वगैरे देशांत प्रवास केला. ईजिप्तमध्यें असतांना, त्यानें पौर्वात्य तत्त्वज्ञानाची माहिती मिळविली असावी, असें मानण्यास जागा आहे. खिस्ती शकापूर्वी ३८६ सालीं, तो अॅथेन्स शहरास परत आला; व त्यानंतर लवकरच त्यानें तरुणांना ज्ञानामृत पाजण्याकरितां गुरुकुल स्थापन केलें. अॅथेन्स शहराच्या उत्तरेस, सुमारें एक मैलाचे अंतरावर, एक अत्यंत रमणीय बगीचा होता. तेथें प्लेटोचें एक लहानसें घर होतें. त्या घरांत प्लेटो रहात असे, व बागेंतील झाडांच्या शीतल छायेखालीं बसून किंवा सहल करीत तो आपल्या शिष्यांना ज्ञानामृत पाजीत असे. ज्या जागेवर हा बगीचा होता त्या जागेची देवता अॅकॅडिमस् ही असल्याकारणानें प्लेटोच्या ह्या शिक्षणसंस्थेस "अॅकॅडमी" हें नांव पडलें आहे. ह्या शिक्षणसंस्थेची कीर्ति लवकरच जिकडे तिकडे पसरली; व सर्व ग्रीस देशांतून बरेच विद्यार्थी तेथें ज्ञान संपादन करण्याकरितां येऊं लागले. त्याच्या शिष्यवर्गात अरिस्टॉटल ह्या नांवाचा एक शिष्य होता. तो पुढें प्रचंड तत्त्ववेत्ता म्हणून प्रसिद्धीस आला. ह्या संस्थेंत प्लेटोनें सुमारें ४० वर्षे शिक्षण देण्याचें काम केलें. तो शिक्षण मोफत देई, परंतु कोणी शिष्यानें देणग्या दिल्यास त्या तो नाकारीत नसे. अॅकॅडेमीची स्थापना केल्यानंतर प्लेटोनें आपलें सर्व आयुष्य आपल्या शिष्यांना शिक्षण देण्यांत व ग्रंथरचनेंत घालविलें. त्यानें गृहस्थाश्रमाची दीक्षा घेतली होती, असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसत नाहीं.

तेव्हां अर्थातच त्याचा शिष्यवर्ग हेंच त्याचें कुटुंब, व त्यांच्यासंबंधीची व्यवस्था हाच त्याचा संसार; ह्यापलीकडे त्यास कुटुंब किंवा संसार नव्हता. प्रचंड बुद्धिमत्ता, अत्यंत शुद्ध आचरण, साधी राहणी, निर्लोभता, व तरुणांना सज्ञान व सच्छील करण्याची उत्कट इच्छा, इत्यादि त्याच्या अनेक सद्गुणांमुळें तो आपल्या शिष्यांना अत्यंत प्रिय असे व त्याचे इतर देशबांधवही त्यास फार पूज्य मानीत असत.

येणेंप्रमाणें आपल्या शिक्षणसंस्थेंत तरुण शिष्यांना ज्ञानामृत पाजीत असतां त्यास आपली राजकीय तत्त्वें अमलांत आणण्याची संधि आली. ती अशीः— सिऱ्याक्यूजचा राजा दुसरा डायोनिसिअस ह्याचा मामा डायन हा प्लेटोचा मित्र असून त्यास फार चहात असे. डायोनिसिअस गादीवर बसल्यावर, डायननें सिऱ्याकूजची राज्यव्यवस्था सुधारण्याकरितां प्लेटोस बोलाविण्याविषयीं डायोनिसिअसचें मन वळविलें, व त्याप्रमाणें प्लेटोस आमंत्रण देण्यांत आलें. त्या आमंत्रणाचा स्वीकार करून प्लेटो सिऱ्याक्यूज येथें गेला. प्लेटोची प्रचंड बुद्धिमत्ता पाहून डायोनिसिअसनें त्याचें अभिनंदन केलें. परंतु प्लेटोनें केलेल्या सूचना त्यास पसंत पडल्या नाहींत. डायननें प्लेटोचा पक्ष धरिला. परंतु त्याचा परिणाम असा झाला कीं, मामाभाच्यांत विसंतुष्टपणा येऊन डायोनिसिअसनें डायनचे हातांत असलेली सर्व सत्ता काढून घेऊन त्यास हद्दपार केलें. आपण ज्या उद्देशानें सिऱ्याक्यूझ येथें आलों, तो सफल होण्याचें बाजूलाच राहिलें; उलट त्यामुळें मात्र आपला मित्र डायन ह्यावर विनाकारण संकट ओढवलें, हें पाहून प्लेटोस फार दुःख झालें, व तो लवकरच ॲथेन्सला परत गेला. पुढें डायननें सैन्य जमवून डायोनिसिअसचा पराभव केला व आपण स्वतः गादीवर बसला. ह्या कामीं त्यास प्लेटोच्या शिष्याची बरीच मदत मिळाली. परंतु त्यानेंही प्लेटोच्या तत्त्वाप्रमाणें राज्यकारभार न चालवितां प्रजेवर जुलूम केला. त्यामुळें तो प्रजेस अत्यंत अप्रिय होऊन त्याचा प्लेटोच्या ॲकॅडेमींत शिक्षण मिळविलेल्या कॅलिपस नांवाच्या मनुष्यानें विश्वासघात करून खून केला, व एकंदर सिऱ्याक्यूझची स्थिति न सुधारतां अधिकच वाईट झाली. ह्या सिऱ्याक्यूझ–प्रकरणाशीं प्लेटोच्या कांहीं शिष्यांचा व खुद्द प्लेटोचा संबंध असल्यामुळें प्लेटोवर व त्याच्या शिक्षणसंस्थेवर टीकांचा भडिमार सुरू होऊन हें गुरुकुल म्हणजे कारस्थानांचे आगर आहे असें त्याचे कांहीं शत्रू म्हणूं

लागले. खुद्द प्लेटोसही फार वाईट वाटलें. परंतु त्याच्या, ग्रीस देशाच्या, व जगाच्या सुदैवानें ही ॲकॅडेमी वादळांतून सुरक्षित निभावून प्लेटोच्या मृत्यूनंतरही कित्येक वर्षे तिचें सत्कार्य अव्याहतपणें चालू होतें. प्लेटो खिस्ती शकापूर्वी ३४७ व्या वर्षी मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ८० वर्षांचें होतें.

## प्लेटोचे ग्रंथ.

प्लेटोनें रचिलेले ग्रंथ काल्पनिक संवादरूपानें असल्याकारणानें त्यांस Dialogues of Plato ( प्लेटोचे संवाद ) हें नांव पडलेलें आहे. प्रत्येक संवादास अर्थातच निरनिराळें नांव आहे. ह्या संवादांची संख्या सुमारें २१।२२ असुन त्या द्वारें प्लेटोनें विविध विषयांवर आपले विचार व्यक्त केले आहेत. ही संवादरूपानें विचार व्यक्त करण्याची पद्धति स्वीकारण्यांत त्यानें आपला गुरु साक्रेटिस ह्याचें अनुकरण केलें आहे. ज्याप्रमाणें साक्रेटिस प्रश्नोत्तररूपानें ज्ञान देत असे–एखाद्यानें पृच्छा करावी, तिचें उत्तर साक्रेटिसानें द्यावें, दुसऱ्या एखाद्यानें शंका काढावी, व त्याचें निरसन साक्रेटिसानें करावें–अशा रीतीनें ज्याप्रमाणें तो प्रचलित कल्पना विचाराच्या कसोटीस लावून त्यांतील गुणदोष दाखवीत असे, त्याप्रमाणें प्लेटोनें काल्पनिक संवादांच्या रूपानें आपले विचार व्यक्त केले आहेत. ह्यांपैकीं बहुतेक संवादांत साक्रेटिस ही मुख्य भूमिका असून त्याच्या मुखानें प्लेटोनें आपले सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. ह्या संवादरूपी पद्धतीमुळें तात्विक विवेचनास जो व्यवस्थितपणा पाहिजे तो कोठें कोठें नष्ट झाला आहे. इतकेंच नव्हे तर कांहीं ठिकाणीं ही पद्धति कंटाळवाणी झाली आहे. उलटपक्षीं कित्येक ठिकाणीं कवीची प्रतिभा व तत्त्ववेत्त्याची रुक्ष विवेचनपद्धति ह्या परस्परविरोधी गुणांचा हृदयंगम संगम झालेला असून संवाद वाचतांना मनास मनस्वी आल्हाद होतो. ह्या संवादरूपी ग्रंथांत प्लेटोनें अध्यात्मिक, नैतिक, सामाजिक, राजकीय, शिक्षणविषयक वगैरे शेंकडो विषयांवर आपले विचार व्यक्त केले आहेत, व त्यामुळें त्या ग्रंथांना बऱ्याच अंशानें विद्याकोषाचें ( Enyclopaedia ) स्वरूप प्राप्त झालेलें आहे.

## प्लेटोचे राजकीय विचार.

प्लेटोचें चरित्र व त्याच्या ग्रंथांचें स्थूल स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें आहे. आतां आपण त्याच्या राजकीय विचारांकडे वळूं. कोणत्याही

तेव्हां अर्थातच त्याचा शिष्यवर्ग हेंच त्याचें कुटुंब, व त्यांच्यासंबंधीची व्यवस्था ह्याच त्याचा संसार; ह्यापलीकडे त्यास कुटुंब किंवा संसार नव्हता. प्रचंड बुद्धिमत्ता, अत्यंत शुद्ध आचरण, साधी राहणी, निर्लोभता, व तरुणांना सज्ञान व सच्छील करण्याची उत्कट इच्छा, इत्यादि त्याच्या अनेक सद्‌गुणांमुळें तो आपल्या शिष्यांना अत्यंत प्रिय असे व त्याचे इतर देशबांधवही त्यास फार पूज्य मानीत असत.

येणेंप्रमाणें आपल्या शिक्षणसंस्थेंत तरुण शिष्यांना ज्ञानामृत पाजीत असतां त्यास आपली राजकीय तत्त्वें अमलांत आणण्याची संधि आली. ती अशीः– सिऱ्याक्यूजचा राजा दुसरा डायोनिसिअस ह्याचा मामा डायन हा प्लेटोचा मित्र असून त्यास फार चहात असे. डायोनिसिअस गादीवर बसल्यावर, डायननें सिऱ्याकूजची राज्यव्यवस्था सुधारण्याकरितां प्लेटोस बोलाविण्याविषयीं डायोनिसिअसचें मन वळविलें, व त्याप्रमाणें प्लेटोस आमंत्रण देण्यांत आलें. त्या आमंत्रणाचा स्वीकार करून प्लेटो सिऱ्याक्यूज येथें गेला. प्लेटोची प्रचंड बुद्धिमत्ता पाहून डायोनिसिअसनें त्याचें अभिनंदन केलें. परंतु प्लेटोनें केलेल्या सूचना त्यास पसंत पडल्या नाहींत. डायननें प्लेटोचा पक्ष धरिला. परंतु त्याचा परिणाम असा झाला कीं, मामाभाच्यांत विसंतुष्टपणा येऊन डायोनिसिअसनें डायनचे हातांत असलेली सर्व सत्ता काढून घेऊन त्यास हद्दपार केलें. आपण ज्या उद्देशानें सिऱ्याक्यूझ येथें आलों, तो सफल होण्याचें बाजूलाच राहिलें; उलट त्यामुळें मात्र आपला मित्र डायन ह्यावर विनाकारण संकट ओढवलें, हें पाहून प्लेटोस फार दुःख झालें, व तो लवकरच ॲथेन्सला परत गेला. पुढें डायननें सैन्य जमवून डायोनिसिअसचा पराभव केला व आपण स्वतः गादीवर बसला. ह्या कामीं त्यास प्लेटोच्या शिष्याची बरीच मदत मिळाली. परंतु त्यानेंही प्लेटोच्या तत्त्वाप्रमाणें राज्यकारभार न चालवितां प्रजेवर जुलूम केला. त्यामुळें तो प्रजेस अत्यंत अप्रिय होऊन त्याचा प्लेटोच्या ॲकॅडेमींत शिक्षण मिळविलेल्या कॅलिपस नांवाच्या मनुष्यानें विश्वासघात करून खून केला, व एकंदर सिऱ्याक्यूझची स्थिति न सुधारतां अधिकच वाईट झाली. ह्या सिऱ्याक्यूझ–प्रकरणाशीं प्लेटोच्या कांहीं शिष्यांचा व खुद्द प्लेटोचा संबंध असल्यामुळें प्लेटोवर व त्याच्या शिक्षणसंस्थेवर टीकांचा भडिमार सुरू होऊन हें गुरुकुल म्हणजे कारस्थानांचे आगर आहे असें त्याचे कांहीं शत्रू म्हणू

लागले. खुद्द प्लेटोसही फार वाईट वाटलें. परंतु त्याच्या, ग्रीस देशाच्या, व जगाच्या सुदैवानें ही ॲकॅडेमी वादळांतून सुरक्षित निभावून प्लेटोच्या मृत्यूनंतरही कित्येक वर्षें तिचें सत्कार्य अव्याहतपणें चालू होतें. प्लेटो ख्रिस्ती शकापूर्वी ३४७ व्या वर्षी मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ८० वर्षांचें होतें.

## प्लेटोचे ग्रंथ.

प्लेटोनें रचिलेले ग्रंथ काल्पनिक संवादरूपानें असल्याकारणानें त्यांस Dialogues of Plato ( प्लेटोचे संवाद ) हें नांव पडलेलें आहे. प्रत्येक संवादास अर्थातच निरनिराळें नांव आहे. ह्या संवादांची संख्या सुमारें २१।२२ असून त्या द्वारें प्लेटोनें विविध विषयांवर आपले विचार व्यक्त केले आहेत. ही संवादरूपानें विचार व्यक्त करण्याची पद्धति स्वीकारण्यांत त्यानें आपला गुरु साक्रेटिस ह्याचें अनुकरण केलें आहे. ज्याप्रमाणें साक्रेटिस प्रश्नोत्तररूपानें ज्ञान देत असे—एखाद्यानें पृच्छा करावी, तिचें उत्तर साक्रेटिसानें द्यावें, दुसऱ्या एखाद्यानें शंका काढावी, व त्याचें निरसन साक्रेटिसानें करावें—अशा रीतीनें ज्याप्रमाणें तो प्रचलित कल्पना विचाराच्या कसोटीस लावून त्यांतील गुणदोष दाखवीत असे, त्याप्रमाणें प्लेटोनें काल्पनिक संवादांच्या रूपानें आपले विचार व्यक्त केले आहेत. ह्यांपैकीं बहुतेक संवादांत साक्रेटिस ही मुख्य भूमिका असून त्याच्या मुखानें प्लेटोनें आपले सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. ह्या संवादरूपी पद्धतीमुळें तात्विक विवेचनास जो व्यवस्थितपणा पाहिजे तो कोठें कोठें नष्ट झाला आहे. इतकेंच नव्हे तर कांहीं ठिकाणीं ही पद्धति कंटाळवाणी झाली आहे. उलटपक्षीं कित्येक ठिकाणीं कवीची प्रतिभा व तत्त्ववेत्त्याची रुक्ष विवेचनपद्धति ह्या परस्परविरोधी गुणांचा हृदयंगम संगम झालेला असून संवाद वाचतांना मनास मनस्वी आल्हाद होतो. ह्या संवादरूपी ग्रंथांत प्लेटोनें अध्यात्मिक, नैतिक, सामाजिक, राजकीय, शिक्षणविषयक वगैरे शेंकडो विषयांवर आपले विचार व्यक्त केले आहेत, व त्यामुळें त्या ग्रंथांना बऱ्याच अंशानें विद्याकोषाचें ( Enyclopaedia ) स्वरूप प्राप्त झालेलें आहे.

## प्लेटोचे राजकीय विचार.

प्लेटोचें चरित्र व त्याच्या ग्रंथांचें स्थूल स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें आहे. आतां आपण त्याच्या राजकीय विचारांकडे वळूं. कोणत्याही

तत्त्ववेत्त्याची तत्त्वज्ञानपद्धति सर्वथैव त्याच्या बुद्धिमत्तेपासून उद्भूत झालेली नसते; पूर्वीच्या तत्त्वज्ञानपद्धतींचा व प्रचलित विचारांचा त्याचे मनावर थोडातरी परिणाम झालेला असतो. ख्रिस्ती शकापूर्वी पांचव्या शतकापर्यंत ग्रीस देशांत राजकीय तत्त्वज्ञानाची फारशी प्रगति झालेली नव्हती. अधिकाराशिवाय मनुष्याची योग्यता समजत नाहीं; ( Office will prove the stuff of which a man is made ). प्रत्येक व्यक्ति राष्ट्राकरितां आहे; राष्ट्रीयजविनाव्यतिरिक्त खरें जीवन नाहीं; राजकारणाचा विषय ( Sphere ) नीतिशास्त्राच्या विषयाहून भिन्न नाहीं; राजकीय संस्थांचा व राज्यव्यवस्थेचा हेतु नागरिकांना सद्गुणसंपन्न करणें हा होय; सद्गुणांवांचून सुखप्राप्ति नाहीं; दैवी कायदा हा मानवी कायद्याचें प्रमाण असून त्याहून श्रेष्ठ आहे; मानवी कायदे दैवी कायद्यास अनुसरून असले पाहिजेत; कायद्याचें रक्षण करणें हें प्रत्येक नागरिकाचें पवित्र कर्तव्य होय—इत्यादि राजकीय कल्पना परंपरेनें लोकांत रूढ झालेल्या होत्या. परंतु अद्यापि राजकीय शास्त्राचा सांगोपांग व व्यवस्थितपणें विचार करण्यास ग्रीक लोक लागले नव्हते. ख्रिस्ती शकापूर्वी पांचव्या शतकाच्या उत्तरार्धात पेरिक्लिज ह्या नांवाचा मुत्सद्दी अधिकारारूढ झाला. त्यानें आपले कारकीर्दींत सामान्य लोकांना अधिकाधिक हक्क देऊन प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा ( Democracy ) पूर्णपणें विकास केला. विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य ह्यांना पूर्ण मुभा मिळाली, व त्यामुळें विद्वान लोक राजकीय बाबींची निर्भीडपणानें चर्चा करूं लागले. ख्रिस्ती शतकाचे पूर्वी पांचवे शतकाच्या उत्तरार्धात अथीनियन लोक कोणत्या प्रश्नाविषयीं मुख्यत्वेंकरून विचार करीत होते, हें जर आपण पाहूं लागलों, तर ते विषय राजकारण, मानवी आचरण व मानवी संस्था हे होत, असें आपणांस दिसून येईल. प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें समर्थन हा राजकीय विचारांचा नैसर्गिक उगम होय. ( The defence of democracy is the natural beginning of political thought ) असें एका ग्रंथकर्त्यानें म्हटलें आहे, तें अगदीं खरें आहे. वर सांगितलेल्या शतकांत ॲथेन्समध्यें प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा पूर्ण विकास झाला होता व अनेक ग्रंथकार निर्माण होऊन त्यांनीं आपले राजकीय विचार स्पष्टपणें व्यक्त करण्यास सुरुवात केली होती. तसेंच राजकारणांत पडून देशसेवा करावी व योग्यता संपादन करावी अशी प्रत्येक अथीनिअन तरुणाची महत्त्वाकांक्षा असल्यामुळें त्यांना राजकीय शिक्षण देण्याकरितां सॉफिस्ट ह्या नांवाचा

शिक्षकवर्ग उत्पन्न झाला होता. हे शिक्षक गांवोगांव हिंडून वेतन घेऊन नाना-प्रकारच्या विषयांचें शिक्षण देत असत; परंतु मुख्यत्वेंकरून त्यांच्या शिक्षणाचे विषय राजकीयच असत. त्यांचीं राजकीय मतें एकाच प्रकारचीं नसून कांहीं अनियंत्रित राज्यसत्तेचे पुरस्कर्ते होते, तर कांहीं सर्व सत्ता कायद्यांनीं मर्यादित असली पाहिजे, हें तत्त्व प्रतिपादन करीत असत. सारांश, ख्रिस्ती शकापूर्वी ५ शतकांत भिन्न भिन्न राजकीय विचारांनीं ॲथीनिअन लोकांचीं मनें बरींच क्षुब्ध झालेलीं होतीं.

अशा वेळीं साक्रेतिसाचा अवतार होऊन त्यानें आपल्या शिक्षणक्रमास सुरुवात केली. वरील सॉफिस्ट शिक्षकांचा वर्ग सॉक्रेतिसास आवडत नव्हता. ते द्रव्यलोभी असून लोकांना खरें व हितकारक शिक्षण देण्याऐवजीं त्यांना केवळ रुचेल असेंच शिक्षण देतात, असा त्यांच्यावर त्याचा आक्षेप असे. साक्रेतिसाच्या विचारपद्धतीची सर्व इमारत, सद्गुण म्हणजे ज्ञान होय ( Virtue is Knowledge ) ह्या तत्त्वाचे पायावर उभारलेली होती. खऱ्याखुऱ्या ज्ञानावांचून अंगीं सद्गुण येणें शक्य नाहीं, व राज्यव्यवस्था चांगल्या रीतीनें करितां येणार नाहीं, असें त्याचें मत होतें; व ह्या मतास अनुसरून तो नेहमीं प्रतिपादन करीत असे कीं, जे ज्ञानी आहेत त्यांच्याच हातांत राज्यसूत्रें दिलीं पाहिजेत, इतरांचे हातांत तीं देतां कामा नये. ( They alone shall rule who know ). राज्यशासन ही कला आहे व ज्याप्रमाणें इतर कलावंतांना आपल्या कलेचें चांगलें ज्ञान असावें लागतें, त्याप्रमाणेंच ज्यांना राज्यशासनकलेचें पूर्ण ज्ञान आहे, त्यांच्याच हातीं राज्यसत्ता द्यावी, तरच राज्यव्यवस्था चांगली राहील, नाहीं तर राहणार नाहीं, असें तो वारंवार म्हणत असे. अर्थातच राज्यकर्ते पूर्ण ज्ञानी अतएव पूर्ण सद्गुणी असले म्हणजे त्यांची सत्ता कायद्यानें किंवा अन्य रीतीनें मर्यादित करण्याचें कारण नाहीं. सबब राज्यकर्त्यांची सत्ता अमर्यादित असावी, हें साक्रेतिसाचें दुसरें राजकीय तत्त्व होतें. त्याचें तिसरें राजकीय तत्त्व हें होतें कीं राज्यकर्त्यांनीं प्रजेच्या कल्याणाखेरीज अन्य हेतु यत्किंचितही मनांत बाळगूं नये. ह्या तिन्ही तत्त्वांचा प्लेटोच्या राजकीय विचारांवर बराच परिणाम झालेला होता, हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

साक्रेतिसाच्या स्वतंत्र वृत्तीमुळें व विचारांमुळें तो कित्येक स्वार्थसाधु लोकांना व अधिकाऱ्यांना अप्रिय झाला होता, व त्यांनीं त्याचा छळ करून,

तो तरुणांचीं मनें बिघडवितो असा त्याचेवर खोटा आरोप लादून, सरते शेवटीं त्यास अधिकाऱ्यांनीं देहान्ताशिक्षा दिली हें वर सांगितलेंच आहे. ज्या राज्यपद्धतीखालीं साक्रेतिसासारख्या साधूस निष्कारण छळ सोसून प्राणास मुकावें लागलें, तींत कांहीं तरी मोठाले दोष असले पाहिजेत, असें प्लेटोस वाटूं लागलें. व खरोखर ह्या वेळीं अथीनिअन लोकांची अवनति होण्यास सुरुवात झाली होती. राष्ट्रांतील एकी कमी होत चालली होती. पेरीक्लीजच्या कारकीर्दींत लोकांना सभेंत जाण्याबद्दल व जूररचें काम करण्याबद्दल वेतन देण्याचा कायदा पसार झाला होता; इतकेंच नव्हे तर सामान्य लोकांना नाटक, सर्कसीचे खेळ, शर्यती इत्यादि करमणुकीचीं साधनें प्राप्त व्हावीं म्हणून त्यांना सरकारी खजिन्यांतून देणग्याही देण्यांत येत होत्या. त्याचा परिणाम असा झाला कीं, लोक द्रव्य-लोभी व चैनी बनून राजकारण म्हणजे केवळ संपत्ति मिळविण्याचें साधन होय, असें त्यांना वाटूं लागलें. देशसेवा हा उदात्त हेतु दिवसेंदिवस नाहींसा होऊन त्याऐवजीं स्वार्थपरायणता ही नीच वृत्ति फैलावत चालली. राजशासनकलेचें ज्ञान कमी होत चाललें, व जो तो आपल्या अंगीं योग्यता आहे किंवा नाहीं याचा विचार न करितां केवळ स्वार्थबुद्धीनें प्रेरित होऊन अधिकार प्राप्त व्हावा म्हणून प्रयत्न करूं लागला. सारांश, अज्ञान व स्वार्थबुद्धि हे दोन रोग ॲथी-निअन लोकांना जडलेले असून त्यामुळें त्यांची कार्यक्षमता, त्यांचा उज्ज्वल देशाभिमान, त्यांचें ऐक्य वगैरे पूर्वीचे सर्व सद्गुण नष्ट होत चालले होते. प्लेटोच्या राजकीय विचारांचें धोरण चांगलें समजण्यास त्या वेळची वर दिलेली ॲथीनिअन लोकांची स्थिति लक्षांत घेणें जरूर आहे.

प्लेटोनें आपले राजकीय विचार मुख्यत्वें करून रिपब्लिक ( उत्तम निर्दोषी संस्थान ), पॉलिटिक्स ( मुत्सद्दी ), व लॉज ( कायदे ) ह्या तीन संवादरूपी ग्रंथांत व्यक्त केले आहेत. इतर संवादांतही मधून मधून राजकीय विचार आढळून येतात; परंतु वरील तीन संवादांचे मुख्य विषय राजकीयच होत. रिपब्लिक ह्या ग्रंथांत उत्तम–पूर्ण निर्दोषी–राज्यपद्धति कोणती ह्याचा विचार केला असून, राज्यकर्ते कसे असले पाहिजेत, त्यांना कोणत्या प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे, व उत्तम राज्यपद्धति कालांतरानें बिघडून जाऊन एकामागून एक अधिकाधिक वाईट राज्यपद्धती कशा निर्माण होतात इत्यादि मुद्यांचें विवेचन केलें आहे. पॉलिटिक्स ह्या ग्रंथांत राजशासन ही कला आहे हें सांगून राज्यकर्ता किंवा

३०



मुत्सद्दी हा कसा असला पाहिजे व त्याचा हेतु कोणता असावा हें सांगितलें आहे. लॉज हा ग्रंथ प्लेटोनें आपल्या वृद्धापकाळीं रचिलेला असून तो त्याचा शेवटचा ग्रंथ होय. रिपब्लिक ह्या ग्रंथांत व्यक्त केलेले आपले अति उदात्त तात्त्विक विचार अमलांत आणणें शक्य नाहीं, त्यांत वर्णन केलेली राज्यपद्धति ध्येयाच्या दृष्टीनें जरी अत्युत्तम असली तरी व्यवहाराच्या दृष्टीनें ती शक्य नाहीं, असें प्लेटोस अनुभवांतीं कळून आल्यावर त्यानें उत्तम शक्य राज्यपद्धति कोणती ( second best ) ह्याचा लॉज ह्या ग्रंथांत विचार केला आहे. ह्या प्रत्येक ग्रंथांतील राजकीय विचारांचें आपण आतां थोडक्यांत सिंहावलोकन करूं. प्रथमतः पॉलिटिक्स हा ग्रंथ घेऊं.

## पॉलिटिक्स ( मुत्सद्दी )

राजकारण ही कला आहे व त्या कलेचें पूर्ण ज्ञान ज्यांस असेल त्यांच्याच हातीं राज्यसूत्रें असावीं, असें साक्रेतिसाचें मत होतें, हें पूर्वी सांगितलेंच आहे. ह्याच सिद्धांत प्रथमतः पॉलिटिक्समध्यें प्लेटोनें स्थापित केला आहे. राजा, मुत्सद्दी, गव्हर्नर ह्यांची ज्ञानी, शास्त्रवेत्ते, कलावंत ह्यांच्या कोटींत गणना होते, व ज्याला राजकारणकलेचें पूर्ण ज्ञान आहे तोच खरोखर राजा, मुत्सद्दी, गव्हर्नर होय. एकतंत्री राज्यपद्धति, ( monarchy ), विशिष्टजन-सत्ताक राज्यपद्धति, ( aristocracy ), प्रजासत्ताक राज्यपद्धति, ( democracy ) सधनसत्ताक राज्यपद्धति, ( Government of the rich ) निर्धनसत्ताक राज्यपद्धति, ( Government of the poor ) कायदेशीर राज्यपद्धति, बेकायदेशीर राज्यपद्धति इत्यादि राज्यपद्धतीचे अनेक भेद करण्यांत येतात. परंतु ज्या तत्त्वांना अनुसरून हे भेद केले जातात तीं सर्व चुकीचीं होत. मुख्य भेद ज्ञान ह्या तत्त्वानुरूप केला पाहिजे. राज्यसूत्रें एका व्यक्तीचे हातांत असोत, किंवा अनेक व्यक्तींचे हातांत असोत, राज्यकार-भार प्रजेच्या अनुमतानें चाललेला असो किंवा नसो, ज्या राज्यपद्धतींत राज-सत्ता ज्ञान्यांच्या हातांत आहे, तीच खरी राज्यपद्धति होय; इतर सर्व राज्य-पद्धती सदोष असून त्या कमीजास्त प्रमाणानें अपायकारक झाल्याशिवाय राहणार नाहींत. आतां राजकारणकला इतर कलांहून अतिशय कठीण आहे, म्हणून अर्थातच तिचें पूर्ण ज्ञान फारच थोड्यांना असूं शकेल प्रजासत्ताक राज्यपद्धतींत सर्वच राज्यकर्ते असतात. परंतु वर सांगितल्याप्रमाणें राजकलेचें

ज्ञान थोड्यांनाच चांगलें अवगत असणें शक्य असल्यामुळें प्रजासत्ताकपद्धति ही सदैव सदोषीच राहाणार. ज्यांना राजकलेचें उत्तम ज्ञान आहे, अशांच्याच हातीं राजसत्ता देण्यांत यावी, व त्यांच्या हातांत एकदां राजसत्ता दिल्यावर ती कायद्यांनीं मर्यादित करण्याचें कारण नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या अधिकारास कायद्यांची मर्यादा घातल्यास नुकसानच होईल समाजाच्या गरजा इतक्या अनेक आहेत व त्याच्या परिस्थितींत वारंवार इतका फरक पडत जातो कीं, सर्व गोष्टींना सर्व काळीं पूर्ण रीतीनें लागू पडतील असे कायदे करणें अशक्य आहे. सबब कायद्यांवर भिस्त न ठेवितां ज्ञानी राज्यकर्त्यांच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेवरच भिस्त ठेवणें अधिक श्रेयस्कर होणार आहे. राज्यकर्त्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांना योग्य मार्ग दाखविण्याकरितां कायदे किंवा नियम करावेत; परंतु जोंपर्यंत ते स्वतः राज्यकलेंत पूर्ण पारंगत आहेत, तोंपर्यंत त्यांना आपल्या स्वतःचें मार्गदर्शनाकरितां कायदे करण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें उत्तम वैद्य किंवा नावाडी केवळ पुस्तकी विद्येवर अवलंबून न राहातां, आपले स्वतःचे बुद्धीचा व अनुभवाचा योग्य वेळीं उपयोग करण्यास चुकत नाहीं, त्याप्रमाणें जो खरा ज्ञानी राज्यकर्ता आहे तो ठराविक नियमांपेक्षां आपले स्वतःचे बुद्धीस व अनुभवास अधिक महत्त्व देऊन राज्यकारभार करीत असतो. व त्यानें कायद्याच्या बाहेर जातां कामा नये असा निर्बंध करणें म्हणजे त्याची पूर्ण बुद्धि व अनुभव ह्यांस मर्यादा घालणें होय. सबब निष्प्रतिबंध अभिज्ञसत्ताक राज्यपद्धति (Rule of the wise unlimited by law) ही तत्त्वतः सर्वांत अति श्रेष्ठ होय असें प्लेटोचें मत आहे.

परंतु, प्लेटो म्हणतो, अशा ज्ञानी राजकर्त्यांची परंपरा राहाणें अशक्य आहे, इतकेंच नव्हे, तर अधिकारमद इतका घातुक आहे कीं, चांगले ज्ञानी लोकही त्यामुळें अंध होण्याचा संभव असतो. सबब, ज्ञानी राज्यकर्ता नसेल तर कायद्यांनीं नियमित अशी राजसत्ता असणें अगदीं अवश्यक आहे. राज्यकर्त्यांना ज्ञानही नाहीं व त्यांच्या सत्तेस कायद्याचा आळाही नाहीं, अशी स्थिति असली म्हणजे, प्रजेच्या दुःखास सीमा नाहीं. राज्यकर्त्यांच्या ठिकाणीं राजकलेचें पूर्ण ज्ञान नसल्यास निदान त्यांनीं कायद्याचें उल्लंघन करूं नये, कायद्याप्रमाणें राज्यकारभार चालवावा. येणेंप्रमाणें तात्त्विक विवेचन केल्यानंतर प्लेटोनें राज्यपद्धतीचें वर्गीकरण केलें आहे, तें येणेंप्रमाणें:—

१. नियमविरहित प्रज्ञसत्ताक राज्यपद्धति ( Rule of the wise, one or a few, unfettered by law. )

२. नियमबद्ध एकसत्ताक राज्यपद्धति ( Constitutional Monarchy )

३. नियमबद्ध शिष्टजनसत्ताकराज्यपद्धति ( The rule of the few or aristocracy )

४. नियमबद्ध प्रजासत्ताक राज्यपद्धति ( Constitutional Democracy )

५. नियमरहित प्रजासत्ताक राज्यपद्धति ( Extreme Democracy )

६. नियमरहित शिष्टजनसत्ताक राज्यपद्धति ( Oligarchy )

७. नियमरहित एकसत्ताक राज्यपद्धति ( Tyrrany )

प्लेटोच्या मतें पाहिली म्हणजे नियमविरहित प्रज्ञसत्ताक राज्यपद्धति श्रेष्ठ होय. परंतु ही मनोरथराज्यपद्धति ( ideal constitution ) बाजूला ठेविल्यास ( Constitutional Monarchy ) नियमबद्ध एकसत्ताक राज्यपद्धति सर्वांत उत्तम प्रतीची होय असें प्लेटोचें मत आहे. तिच्या खालोखाल नियमबद्ध शिष्टजनसत्ताक राज्यपद्धति, तिच्या खालोखाल नियमबद्ध प्रजासत्ताक राज्यपद्धति, तिच्या खालोखाल नियमरहित प्रजासत्ताक राज्यपद्धति, तिच्या खालोखाल नियमरहित शिष्टजनसत्ताक राज्यपद्धति, व तिच्या खालोखाल म्हणजे सर्वांत कनिष्ठ नियमरहित एकसत्ताक राज्यपद्धति, असे हे राज्यपद्धतींचे भेद प्लेटोनें पॉलिटिकुस ग्रंथांत केलेले आहेत. राज्यपद्धति नियमबद्ध असेल तर प्रजासत्ताक राज्यपद्धति कनिष्ठ होय; नियमविरहित असेल तर एकसत्ताक राज्यपद्धति कनिष्ठ होय. येणेंप्रमाणें राज्यपद्धतींचें वर्गीकरण केल्यानंतर व त्यांची सापेक्ष योग्यता सांगितल्यानंतर प्लेटोनें ज्ञानी राज्यकर्त्याचें उद्दिष्ट कोणतें हें सांगितलें आहे. तो म्हणतो, सद्गुण दोन प्रकारचे आहेत. एक ओजस्वी ( Strong and energetic ) व दुसरे सौम्य ( gentle ). ह्या दोन्ही प्रकारच्या सद्गुणांचें प्रमाणशीर संमिश्रण झाल्याशिवाय खरें नागरिकत्व उत्पन्न होत नाहीं. अतएव जनतेमध्यें हें संमिश्रण उत्पन्न करणें हा ज्ञानी राज्यकर्त्यांचा हेतु आहे. ह्यासंबंधानें ग्रोटनें आपल्या Plato and other companions of Socrates ह्या ग्रंथांत जें लिहिलें आहे तें वाचण्यासारखें आहे. तो म्हणतोः—

"The great scientific Governor being thus defined, and logically distinguished from all others liable to be

confounded with him, Plato concludes by a brief statement of what his principal functions are. He will aim at ensuring among his citizens the most virtuous characters and the best ethical combinations. Like the weaver he will put together the great political web or tissue of improved citizenship intertwining the strong and energetic virtues, with the yielding and gentler virtues. Both these dispositions are parts or branches of virtue, but there is a natural variance or repulsion between them. Each of them is good in proper measure and season; each of them is bad, out of measure and season. The combination of both, in due proportion, is indispensable to form the virtuous citizen, and that combination, it is the business of the scientific Governor to form and uphold. It is with a view to this end that he must set at work all the agents of teaching and education, and must even interfere to arrange the intermarriages of the citizens; not allowing the strong and courageous families to form alliance with each other, lest the breed should in time become too violent, nor the gentle and quiet families to do the like, lest the offspring should degenerate into stupidity"

( ह्याचा सारांशः–ज्ञानी राजकर्त्याची व्याख्या केल्यावर व त्याचीं लक्षणें त्याच्यासारख्या भासणाऱ्या परंतु ज्ञानी नसणाऱ्या इतर राजकर्त्यांच्या लक्षणांहून कशीं भिन्न आहेत हें दाखविल्यावर, प्लेटोनें त्याचीं मुख्य कर्तव्यें कोणतीं हें सांगितलें आहे. ज्ञानी राजकर्ता नागरिकांचे ठिकाणीं उच्चतम शील आणण्याचा व उत्तम प्रकारच्या सद्गुणांचा परिपोष करण्याचा हेतु मनांत धरील. ओजस्वी व सौम्य सद्गुण हे दोन प्रकारचे सद्गुणरूपी तंतू एकमेकांशीं संलग्न करून सुसंस्कृत नागरिकत्वरूपी राजकीय धागा तो तयार करील. ओजस्वी व सौम्य मनोवृत्ती ह्या दोन्ही सद्गुणाचेच भाग होत, परंतु त्या दोहोंमध्यें नैसर्गिक विरोध आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या मनोवृत्ती प्रमाणांत असल्या व योग्य वेळीं व्यक्त झाल्या,

तर त्या हितकारक असतात. परंतु त्या जर मर्यादेच्या बाहेर गेल्या व अयोग्य वेळीं व्यक्त करण्यांत आल्या, तर त्या अहितकारक होतात. सबब, त्यांचें प्रमाणशीर संमिश्रण हें सद्गुणी नागरिक बनविण्यास अगदीं अवश्य आहे; व अशा प्रकारचें संमिश्रण बनविणें व तें राखणें हें ज्ञानी राज्यकर्त्यांचें काम होय. हाच हेतु मनांत धरून शिक्षणाचीं जीं साधनें आहेत तीं त्यानें अमलांत आणिलीं पाहिजेत. इतकेंच नव्हे, तर नागरिकांचे विवाहाचे बाबतींत हात घातला पाहिजे. सशक्त व धैर्यशाली कुटुंबांचा आपआपसांतच बेटीव्यवहार झाल्यास, त्यापासून होणारी प्रजा आततायी होण्याचा संभव आहे; तसेंच, सौम्य व शांत कुटुंबांचा आपआपसांतच बेटीव्यवहार झाला, तर त्यामुळें प्रजा मूर्ख व निःसत्व बनण्याचा संभव आहे. सबब, एकाच प्रकारच्या मनोवृत्ती ज्यांच्यामध्यें आहेत, अशा कुटुंबांमध्यें बेटीव्यवहार होऊं न देतां, भिन्नभिन्न मनोवृत्तींच्या कुटुंबांत बेटीव्यवहार घडवून आणण्याचा ज्ञानी राज्यकर्ता प्रयत्न करील. )

मनुष्यांत ओजस्वी व सौम्य असे दोन्ही प्रकारचे सद्गुण योग्य प्रमाणानें असले पाहिजेत, त्याशिवाय तो खरा नागरिक बनणार नाहीं, हें, तत्त्व फार मार्मिक असून, आह्मां हिंदु लोकांनीं तर तें विशेषच लक्ष्यांत ठेविण्यासारखें आहे.

येणेंप्रमाणें पॉलिटिक्समधील राजकीय विचारांचा सारांश आहे. आतां आपण ' रिपब्लिक ' ह्या ग्रंथांतील राजकिय विचारांकडे वळूं.

रिपब्लिक हा शब्द हल्लीं प्रजासत्ताक राज्यपद्धति ह्या अर्थानें वापरण्यांत येतो. परंतु प्लेटोनें तो ह्या अर्थी वापरलेला नसून राज्य, संस्थान ( State ) ह्या अर्थानें वापरलेला आहे. ह्या रिपब्लिक ग्रंथांत प्लेटोनें मनोरथराज्यपद्धति (Ideal government ) निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या ग्रंथाचें दुसरें नांव ' न्यायाविषयीं ' ( ' concerning justice ' ) हें होय. न्याय म्हणजे काय ? न्याय–अन्याय ह्यांच्या परिणामाकडे न पाहतां न्याय वस्तुतःच, जात्याच, अन्यायापेक्षां सुखावह आहे कीं काय ? ह्या प्रश्नांचें विवेचन करणें, हा ह्या ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे. परंतु, न्याय हा सद्गुण जसा व्यक्तींत आढळतो तसा समाजांतही आढळतो, किंबहुना समाजांत तो ज्यास्त स्पष्टपणें दिसून येतो. सबब, समाजाची उत्क्रांति होण्यास उत्तम राज्यपद्धति कोणति, ही उत्तम राज्यपद्धति चिरकाल टिकण्यास राज्यकर्त्यांचें शिक्षण कसें असावें, इत्यादि मुद्यांचा अनुषंगानें विचार करून न्यायाचें खरें स्वरूप व त्याचें नैसर्गिक

सुखावहत्व दाखविण्याचा प्लेटोनें प्रयत्न केला आहे. बळी तो कान पिळी, बलवंताचें हित तो न्याय ( Justice is the interest of the stronger) इत्यादि न्यायाबद्दलच्या प्रचलित कल्पना चुकीच्या आहेत हें दाखवून न्यायाचें खरें स्वरूप पाहण्यास, व न्याय स्वतःसिद्ध सुखावह आहे किंवा नाहीं हें ठरविण्यास, मनोरथराज्यपद्धति बनविणें अवश्य आहे असें सांगून ती बनविण्यास प्लेटोनें आरंभ केला आहे. मनुष्यांना परस्परांची जरूरी लागते, त्यामुळें समाज अस्तित्वांत येतो. प्रत्येक व्यक्तींत विशिष्ट प्रकारचा गुण किंवा वृत्ति असते व तदनुरूप तो धंदा किंवा उद्योग करितो, व अशा रीतीनें नैसर्गिक पात्रतेच्या ( Natural aptitude ) तत्त्वावर उभारलेल्या श्रमविभागपद्धतीचा फायदा घेऊन समाज आपलें जीवन चालवीत असतो. परंतु कालांतरानें समाज मोठा होऊन त्याचे ताब्यांत असलेली जमीन त्यास पुरेशी होत नाहीं, व शेजाऱ्याची जमीन घेण्याची त्यास इच्छा होते व ह्यामुळें सैनिक किंवा क्षत्रियवर्ग निर्माण होतो. ज्याप्रमाणें सर्वच व्यक्ती शेतकरी किंवा व्यापारी होण्यास पात्र नसतात, त्याप्रमाणेंच सर्व सैनिक होण्यास पात्र नसतात. किंबहुना युद्धकला ही इतर कलांपेक्षां अधिक कठीण व महत्त्वाची आहे. सबब ज्याचें अंगीं नैसर्गिक क्षत्रियत्व असेल त्यांनाच सैनिक निवडले पाहिजे. हे सैनिक राज्याचे संरक्षक ( Guardians of the state ) होत, व त्यांची नैसर्गिक पात्रतेवर निवड केल्यावर त्यांना उत्तम प्रतीचें शिक्षण दिलें पाहिजे. ह्या राज्यसंरक्षकांचे अंगीं जात्याच ओजस्वी व सौम्य सद्गुणांचें योग्य संमिश्रण झालेलें असून ते शरीरानें बळकट असले पाहिजेत. व त्यांचे अंगीं चपलता, धैर्य वगैरे गुण असले पाहिजेत. ते आपल्या देशबांधवांशीं सलोख्यानें व प्रेमानें वागणारे व शत्रूंना निष्ठुरपणानें शासन करणारे, असे असले पाहिजे. व ह्या त्यांच्या नैसर्गिक गुणांचा चांगला विकास व्हावा म्हणून त्यांना लहानपणापासून उत्तम प्रकारचें शारीरिक, बौद्धिक, नैतिक व धार्मिक शिक्षण दिलें पाहिजे.

येणेंप्रमाणें सैनिक वर्गास उत्तम शिक्षण दिल्यावर त्यापैकीं जे वयोवृद्ध असून देशसेवेंत विशेष निष्ठावंत असतील, आपल्या देशबांधवांचें सुख तेंच आपलें सुख, त्या व्यतिरिक्त आपलें दुसरें सुख नाहीं, असें जे विशेष रीतीनें मानीत असतील त्यांची निवड केली पाहिजे; व नंतर त्यांना भिन्नभिन्न परिस्थितींत भिन्नभिन्न प्रकारांनीं कसोटीस लावून त्यांची

कडक परीक्षा घेतल्यावर, त्यांपैकीं ज्यांची देशभक्ति, निश्चय, धैर्य वगैरे सद्गुण अचल राहतील, त्यांच्याच हातांत राज्यसूत्रें दिलीं पाहिजेत. खरोखर पहातां ह्या राजकर्त्यांच्या वर्गासच ( Guardians of the State ) राष्ट्रसंरक्षक हें नांव द्यावें व बाकीच्या सैनिकांना सहाय्यक ( Auxiliaries ) हें नांव द्यावें. राष्ट्रसंरक्षकांनीं राज्यकारभार चालवावा;त्यांनीं सहाय्यकांवर व सामान्य जनतेवर प्रेम करून, त्यांच्यांत एकोपा वाढवून राष्ट्राचें शत्रूपासून संरक्षण करावें व अशा रीतीनें राष्ट्रीय स्वातंत्र्याचें घटक ( Artificers of freedom ) बनावें. सहाय्यकांनीं व सामान्य जनतेनें राजकारणांत ढवळाढवळ न करितां राष्ट्रसंरक्षकांच्या आज्ञेप्रमाणें वागून आपआपला उद्योगधंदा योग्य रीतीनें करावा; व्यक्तींत किंवा राष्ट्रांत चार गुण असले पाहिजेत; ते येणेंप्रमाणें:-ज्ञान(Wisdom). धैर्य ( Courage ); नियम, किंवा राष्ट्रसंरक्षक, सहाय्यक व सामान्य लोक ह्यांमधील सलोखा ( Temperance ); व न्याय ( Justice ) म्हणजे प्रत्येक वर्गानें व व्यक्तीनें दुसऱ्याचे कामांत ढवळाढवळ न करितां, आपआपलें काम चोख रीतीनें करणें. न्याय ( Justice ) हा शब्द प्लेटोनें विशेष अर्थानें वापरलेला आहे. त्याचें भाषांतर स्वधर्म ह्या शब्दानें केल्यास चुकीचें होणार नाहीं. ज्या अर्थीं भगवद्गीतेंत स्वधर्म हा शब्द वापरलेला आहे, त्याच अर्थीं प्लेटोनें न्याय हा शब्द वापरलेला आहे. असो; वर सांगितल्याप्रमाणें राज्यव्यवस्था अमलांत आली म्हणजे ज्ञान ( Wisdom ) हा सद्गुण राष्ट्रसंरक्षकांचे वर्गांत विशेष रीतीनें आढळून येईल; धैर्य हा सद्गुण सहाय्यकांचे वर्गांत विशेष आढळेल; नियम हा सद्गुण सामान्य लोकांत विशेष आढळेल; व न्याय किंवा स्वधर्मनिष्ठा हा तिन्ही वर्गांत सांपडेल. अशी राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था ज्या राष्ट्रांत आहे तें राष्ट्र सर्वगुणसंपन्न होऊन सुखी होईल.

राष्ट्रसंरक्षकांची वरीलप्रमाणें निवड करून त्यांचे हातांत अधिकारसूत्रें दिल्यावर एक दंतकथा उत्पन्न करून ती सर्वांच्या हाडींमांसीं खिळविली पाहिजे, असें प्लेटोचें म्हणणें आहे. विशेषतः सामान्य लोकांच्या मनावर आरंभापासून असें ठसविलें पाहिजे कीं, सर्व वर्गांतील लोक-म्हणजे राष्ट्रसंरक्षक, सहाय्यक, व सामान्यजन हे आपआपल्या गुणांसह व साधनांसह धरणीच्या उदरांतून निर्माण झालेले आहेत. सबब सर्वांनीं आपल्या देशास माता मानून तिचें शत्रूपासून रक्षण केलें पाहिजे, व तिची सदैव सेवा केली

पाहिजे. सर्व एकाच मातेचीं लेंकरें असल्यामुळें बंधू होत. परंतु त्यांच्या रचनेंत परमेश्वरानें भेद केला आहे. राष्ट्रसंरक्षकांना त्यांनीं सोन्याचें, सहाय्यकांना रुप्याचें, व सामान्य लोकांना लोह व पितळ यांचें बनविलें आहे. परमेश्वरानें केलेल्या ह्या नैसर्गिक भेदामुळेंच कांहीं राष्ट्रसंरक्षक तर कांहीं सहाय्यक होण्यास पात्र झाले आहेत. बहुधा सोनेरी आईबापांना सोनेरी मुलें होतील, रुपेरी आईबापांना रुपेरी होतील व अशा रीतीनें राष्ट्रसंरक्षकांची व सहाय्यकांची परंपरा कायम राहील. परंतु कसें झालें तरी एकाच कुटुंबांतील हे भेद असल्यामुळें कधीं कधीं सोनेरी आईबापांना रुपेरी मुलें होतील, रुपेरी आइ-बापांना सोनेरी होतील, तसेंच लोहपितळेच्या आईबापांना सोनेरी किंवा रुपेरी मुलें होतील. यास्तव परमेश्वराचें राष्ट्रसंरक्षकांना असें सांगणें आहे कीं, त्यांनीं राष्ट्रांतील सर्व मुलांच्या गुणधर्मांची नीट परीक्षा करून, सोनेरी आईबापांना रुपेरी किंवा लोहपितळेचीं मुलें झालेलीं आहेत असें आढळून आल्यास, किंवा ह्याचे उलट प्रकार आढळून आल्यास त्यात्याप्रमाणें वरच्या वर्गांतील मुलांना खालच्या वर्गांत व खालच्या वर्गांतील मुलांना वरच्या वर्गांत, प्रेमांध न होतां, निःपक्षपातानें घातलें पाहिजे. कारण, राष्ट्रसंरक्षणाचें काम सदैव सोनेरी माणसांचेच हातांत असलें पाहिजे; तें रुपेरी किंवा लोह–पितळेच्या माणसांचे हातांत गेल्यास राष्ट्राचा नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं. ही दंतकथा सर्वांचे मनावर राष्ट्रसंरक्षकांनीं ठसविली पाहिजे, असें प्लेटोचें म्हणणें आहे. बहुतेक लोक दंतकथेवर भरंवसा ठेवण्यास इतके तत्पर असतात कीं, दंतकथेचा प्रसार करण्यास आरंभीं जरी वेळ लागला तरी कालांतरानें ती सर्वांना खरीच वाटून तिचा सर्वांचे मनावर व आचरणावर पूर्ण परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

वर सांगितलेंच आहे कीं जे जात्याच राष्ट्रसंरक्षक होण्यास पात्र आहेत, त्यांना उत्तम तऱ्हेचें शिक्षण दिलें पाहिजे, असें प्लेटोचें मत आहे. परंतु नुसत्या शिक्षणानेंच त्या गुणांचा विकास होऊन ते गुण सदैव शुद्ध राहतील असें प्लेटोस वाटत नाहीं. शिक्षणाचे कार्यास अनुकूल परिस्थितीचीही मदत पाहिजे. म्हणून त्यांची रहाणी, व त्यांची नेहमींची जीवनपद्धति ही अशी पाहिजे कीं, त्यांचे सुवर्णास कशाचाही यत्किंचित्सुद्धां कलंक लागणार नाहीं. त्यांना खाजगी घरें नसावींत, खासगी संपत्ति नसावी, सर्वांनीं एकत्र रहावें, व भोजनही एकत्रच करावें. जरूरीपेक्षां त्यांना अधिक वेतन देऊं नये; त्यांनीं

सोन्यारुप्याचे दागिने वापरूं नयेत, सोन्यारुप्याच्या भांड्यांतून पाणीसुद्धां पिऊं नये, किंबहुना त्यांनीं सोन्यारुप्यास स्पर्शसुद्धां करूं नये. तसेंच त्यांना स्वतंत्र बायकामुलेंही असतां कामा नये. ह्याचा अर्थ स्त्रीपुरुषांचा व्यवहार वाटेल तसा व्हावा असा नव्हे. परंतु राष्ट्रसंरक्षकांनीं व सहाय्यकांनीं हें पूर्ण लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, स्त्रीपुरुषांच्या संगतीचा हेतु विषयसुख नसून उत्तम प्रजोत्पत्ति हा होय. यासाठीं राष्ट्रसंरक्षकांनीं आपल्या नैसर्गिक ज्ञानबलानें अशी कांहीं योजना केली पाहिजे कीं, स्त्रीपुरुषांचा जो संगम व्हावयाचा तो सर्वतोपरि परस्पर अनुरूप अशाच स्त्रीपुरुषांच्यामध्यें व्हावा, व तोही योग्यकाळीं व यथाविधि व्हावा. अशा संगमापासून उत्पन्न झालेलीं मुलें प्रसूति झाल्याबरोबर एकत्र ठेवण्यांत यावीं व आयांनीं तेथें जाऊन त्यांना स्तनपान करावें; परंतु अमकें मूल माझें व अमकें दुसरीचें अशी जाणीव किंवा ओळख त्यांस असूं नये. सारांश, खासगी कुटुंब, खासगी मिळकत वगैरे जीं खासगी बंधनें असतात, व ज्यामुळें स्वार्थबुद्धि उत्पन्न होऊन लोक आपलीं राष्ट्रीय कर्तव्यें विसरतात, त्या सर्व बंधनापासून राष्ट्रसंरक्षक व सहाय्यक अगदीं मुक्त असले पाहिजेत, असें प्लेटाचें मत आहे. "**राष्ट्रमेव कुटुंबकम्**" अशी राष्ट्रसंरक्षकांची व सहाय्यकांची नुसती भावना असून उपयोगी नाहीं, तर त्या भावनेस पोषक व संवर्धक अशी त्यांची जीवनपद्धतीहि असली पाहिजे.

प्लेटोच्या मतें स्त्रियांचे अंगीं पुरुषांप्रमाणेंच सर्व कामें करण्याची पात्रता आहे. स्त्रीपुरुषांमध्यें परमेश्वरानेंच मूलभूत नैसर्गिक भेद उत्पन्न केले आहेत, व गृहकृत्यांखेरीज इतर कामें करण्यास स्त्रिया जात्याच असमर्थ आहेत ही कल्पना प्लेटोस मुळींच पसंत नाहीं. इतकेंच नव्हे, तर ती नैसर्गिक योजनेच्या विरुद्ध आहे असें प्लेटोचें स्पष्ट मत आहे. स्त्रीपुरुषांमध्यें जर कोणता नैसर्गिक भेद असेल तर तो एकच होय. तो हा कीं, एकंदरींत पुरुष स्त्रियांपेक्षां श्रेष्ठ आहेत. परंतु त्यामुळें त्यांचीं कार्यें अगदीं भिन्न व अलग आहेत असें मात्र होत नाहीं. जीं जीं कामें पुरुष करूं शकतील तीं तीं स्त्रियाही करूं शकतील. उत्तम स्त्रिया उत्तम पुरुषांची बरोबरी करणार नाहींत. परंतु शेंकडों स्त्रिया शेंकडों पुरुषांपेक्षां श्रेष्ठ आहेत. वरिष्ठ प्रतीच्या स्त्रिया जरी वरिष्ठ प्रतीच्या पुरुषांची बरोबरी करूं शकऱ्या नाहींत, तरी त्या मध्यम प्रतीच्या पुरुषांपेक्षां श्रेष्ठ होत. सबब, स्त्रीपुरुषांचीं कामें भिन्न आहेत व परस्परांनीं परस्परांच्या

कार्यांत हात घालूं नये, ही कल्पना अगदीं चुकीची आहे. राज्यकारभार असो, किंवा समरांगणावर शत्रूशीं टक्कर देणें असो, किंवा कोणताही उद्योगधंदा असो, किंवा कोणतेंही सार्वजनिक कृत्य असो—असें कोणतेंही कार्य नाहीं, कीं तें करण्यास स्त्रिया जात्याच असमर्थ आहेत; व अशी स्त्रीपुरुषांचे ठायीं एकंदर सामान्य समता असल्याकारणानें कांहीं स्त्रिया पुरुषाप्रमाणेंच राष्ट्रसंरक्षकाचें व सहाय्यकाचें काम बजाविण्यास समर्थ आहेत; व म्हणून अशा स्त्रियांची पुरुषांप्रमाणेंच निवड करून त्या त्या वर्गांत त्यांची योजना केली पाहिजे. ज्या स्त्रिया राष्ट्रसंरक्षक होण्यास पात्र आहेत, त्यांना राष्ट्रसंरक्षकाचे जागीं नेमिलें पाहिजे, व राज्यकारभार, पुरुष-राष्ट्रसंरक्षक व स्त्रीराष्ट्रसंरक्षक ह्या दोघांनीं मिळून केला पाहिजे. ह्या राष्ट्रसंरक्षक-वर्गांतील स्त्रीपुरुषांनीं वर सांगितल्याप्रमाणें एकत्र राहिलें पाहिजे व त्यांचे सर्व व्यवहारही एकत्रच झाले पाहिजेत. ज्याअर्थी स्त्रिया पुरुषांप्रमाणेंच राष्ट्रसंरक्षक व सहाय्यक होण्यास पात्र आहेत, त्याअर्थी पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाही शिक्षण दिलें पाहिजे; स्त्रीपुरुषांचें शिक्षणांत कांहीं भेद करतां कामा नये. पुरुषांप्रमाणेंच त्यांनाही युद्धशास्त्र अवगत पाहिजे. त्यांनींही तालीम केली पाहिजे, व मर्दानी खेळ खेळले पाहिजेत. त्यांचें बौद्धिक, नैतिक व धार्मिक शिक्षण पुरुषांच्या शिक्षणाप्रमाणेंच असलें पाहिजे. लढाई चालली असतां स्त्रीराष्ट्रसंरक्षकांनीं व सहाय्यकांनीं पुरुषराष्ट्रसंरक्षक व सहाय्यक यांचे बरोबर समरांगणावर गेलें पाहिजे, इतकेंच नव्हे, तर मुलांना लहानपणापासून लढाईचा अनुभव असावा व त्याबद्दल भीति वाटूं नये म्हणून त्यांना त्यांनीं आपले बरोबर घेतलें पाहिजे. स्त्रियांचे योग्यतेबद्दल प्लेटोचें किती उदात्त मत होतें हें वरील विचारांवरून स्पष्ट दिसून येतें.

आतां, ही राज्यव्यवस्था कितपत शक्य आहे, हा प्रश्न राहिला. ह्याचें उत्तर देतांना प्लेटो म्हणतो, " ही राज्यव्यवस्था पूर्णपणें शक्य नसेल, परंतु ज्याप्रमाणें एखाद्या कुशल चित्र कारागिरानें आपलें असेल नसेल तितकें कौशल्य खर्च करून पूर्णपणें सुंदर पुरुषाचें चित्र रेखाटलें आहे, परंतु त्यास त्या चित्राबरहुकूम खरा पुरुष दाखवितां येत नाहीं, पण तितक्यावरून त्याच्या चित्राची योग्यता कमी होत नाहीं, त्याप्रमाणेंच, ही जी अत्युत्तम राज्यपद्धति मीं सांगितली आहे तशी राज्यपद्धति हुबेहुब कोठेंही आढळत नसली, तरी तितक्यावरून तिचें श्रेष्ठत्व कमी होतें असें नाहीं. कल्पना ह्या कधींही पूर्णपणें अमलांत आणतां

दा.क्र. ९०३

येत नाहींत; वाणीप्रमाणें सर्वथैव कृति असूं शकत नाहीं; व प्रत्यक्ष सृष्टि ही नेहमीं सत्य सृष्टीहून कमीच असणार. म्हणून माझ्या मनोरथराज्यपद्धती-सारखी राज्यपद्धति कोठेंही सध्यां आढळत नसल्यास नवल नाहीं. तथापि जर तत्त्ववेत्त्यांच्या हातांत राज्यसत्ता येईल किंवा राज्यकर्ते तत्त्ववेत्ते बनतील, तर वरील राज्यपद्धति पूर्णपणें जरी नाहीं तरी बहुतेक अंशांनीं अंमलांत आणणें शक्य आहे. यास्तव प्रथमतः तत्त्ववेत्त्यांच्या हातांत राज्यसूत्रें दिलीं पाहिजेत किंवा निदान राज्यकर्ते हे तत्त्ववेत्ते झाले पाहिजेत."

(Until philosophers are kings, or the kings and princes of the world have the spirit and power of philosophy, and political greatness and wisdom meet in one, and those common natures who follow either to the exclusion of the other are compelled to stand aside, cities will never cease from ill-no, nor the human race as I believe-and then only will our state have a possibility of life and behold the light of day.)

राष्ट्रांत उत्तम प्रकारची राज्यपद्धति स्थापून राष्ट्र गुणसंपन्न व सुखी करण्या-करितां राज्यसूत्रें तत्ववेत्त्यांच्या हातांत दिलीं पाहिजेत हा प्लेटोचा मुख्य सिद्धांत होय. हा सिद्धांत, साक्रेटिसाचें जें तत्त्व कीं, जे ज्ञानी आहेत त्यांनींच राज्यकार-भार चालवावा, त्या तत्वाहून भिन्न नाहीं; किंबहुना त्या तत्त्वाचाच तो अनुवाद आहे. हा सिद्धांत ग्रीक लोकांत त्या वेळीं जे राजकीय विचार प्रचलित होते, त्यांचे विरुद्ध होता. तत्त्ववेत्ते म्हणून ज्यांची त्यां वेळीं ख्याति होती, त्यांपैकीं बहुतेक जण जरी लबाड नसले तरी चमत्कारिक होते, व बाकीचे असून नसून सारखेच म्हणजे निरुपयोगी होत–अशी ग्रीक लोकांची तत्त्ववेत्त्यांविषयीं सामान्य समजूत होती. सबब, राज्यकारभार चालविण्यास समर्थ असे खरे तत्ववेत्ते कोण, ह्याचा प्लेटोनें विचार केला आहे. खरा तत्त्ववेत्ता ज्ञानार्थी असतो; त्यास सर्व प्रकारचें ज्ञान संपादन करण्याची उत्कट इच्छा असते; त्याचें सामान्य लोकांप्रमाणें इंद्रियगम्य बाह्य वस्तूंच्या ज्ञानानें समाधान होत नाहीं; त्याचें तत्त्वाकडे लक्ष्य असतें; व सत्य असत्य, न्याय अन्याय, चांगलेपणा वाईटपणा इत्यादिकांचें रहस्य ओळखून घेण्याकडे त्याची प्रवृत्ति असते. विशेषतः साधुत्वाचें मर्म (idea of the good) जाणण्याची त्यास

मनस्वी इच्छा असते. तो सत्याचा भोक्ता, आत्मानंदीं रत, ऐहिक सुखाचा द्वेष्टा, निर्लोभी, प्रशांत, कार्पण्यरहित, त्रिकालज्ञ, सर्ववेत्ता व उदारमनस्क असा असतो. त्याची स्मरणशक्ति दांडगी असून त्याचें मन अत्यंत थोर व व्यवस्थित असतें. असा सर्वगुणसंपन्न एकच तत्त्ववेत्ता असला, तरी त्याचे हातांत राज्यसत्ता दिल्यास तो एकटाच उत्तम राज्यपद्धति स्थापन करूं शकेल. सामान्य लोक तत्त्ववेत्त्यांची उपेक्षा व निर्भर्त्सना करितात, ह्याचें कारण त्यांचे पाहण्यांत खरे तत्त्ववेत्ते क्वचितच आलेले असतात. वर सांगितलेला खरा तत्त्ववेत्ता त्यांना आढळल्यास लोक तो सांगेल त्याप्रमाणें वागण्यास तयार होतील यांत शंका नाहीं. सामान्य लोक अज्ञानानें फसतात व भोंदू लोकांचे नादीं लागून चांगल्याची अवहेलना करितात; परंतु ते जाणूनबुजून कधींही वाईटाची कांस धरीत नाहींत, त्यांचें अज्ञान नाहींसें होऊन खरा तत्त्ववेत्ता कोणता व खोटा कोणता हें त्यांना कळल्यावर ते खऱ्या तत्त्ववेत्त्यांच्या हातीं राजसत्ता देण्यास कधींही मागें घेणार नाहींत.

खऱ्या तत्त्ववेत्त्यांचे गुण ज्यांचे अंगीं दिसून येतील त्यांची निवड करून त्यांना आणखी विशेष प्रकारचें बौद्धिक व नैतिक ज्ञान दिलें पाहिजे. गणितशास्त्र, भूमिति, ज्योतिःशास्त्र, ध्वनिशास्त्र, इत्यादि तात्त्विक शास्त्रांचें त्यांनीं ज्ञान संपादन करून आपल्या तिसाव्या वर्षापासून पांच वर्षेंपर्यंत नैतिक शास्त्राचा व अध्यात्मज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे व त्यांत प्रावीण्य मिळविल्यावर ३५ वे वर्षीं त्यांनीं सैनिक किंवा इतर खात्यांत नोकरी धरून व्यावहारिक ज्ञान व अनुभव हीं प्राप्त करून घेतलीं पाहिजे. अशा रीतीनें त्यांनीं १५ वर्षें घालविलीं पाहिजेत. अशा रीतीनें पन्नास वर्षांचे झालेल्या मंडळींत जे ज्ञानानें व आचरणानें विशेष नांवालौकिकास चढले असतील त्यांचे हातांत राजसत्ता देण्यांत यावी. ते राज्याधिकारारूढ झाल्यावर त्यांनीं आपलें उरलेलें सर्व आयुष्य राष्ट्रसेवेंत व तत्त्वज्ञानसेवेंत घालवावें. अशा ज्ञानी, सुशिक्षित, वयोवृद्ध, अनुभवी, स्वदेशनिष्ठ व सर्वगुणसंपन्न तत्ववेत्त्यांचे हातीं राज्यकारभार आल्यावर राष्ट्राची स्थिति सर्वोतोपरी उत्तम झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

प्रज्ञसत्ताक राज्यपद्धति सर्वोत्कृष्ट होय, हा सिद्धांत प्लेटोनें पॉलिटिक्स ग्रंथांत प्रतिपादन केला आहे, हें वर सांगितलेंच आहे. त्याच सिद्धांताचें रिपब्लिकमध्यें विस्तारशः विवेचन केलेलें आहे. परंतु प्रज्ञसत्ताक राज्यपद्धति नियमबद्ध असावी

किंवा नियमरहित असावी ह्याचा रिपब्लिकमध्यें स्पष्ट खुलासा केलेला नाहीं. रिपब्लिक हा ग्रंथ प्लेटोनें अगोदर लिहिला व मागाहून पॉलिटिक्स ग्रंथ लिहिला हें जर खरें असेल तर राजसत्ता ज्ञान्यांच्या हातीं असावी हें प्लेटोचें मत प्रथम निश्चित झालें व नंतर त्यास वाटूं लागलें कीं, राजसत्ता ज्ञान्यांच्या हातांत असावी इतकेंच नव्हे तर ती निष्प्रतिबंध असावी, अशी त्याच्या विचाराची उत्क्रांति झाली असावी असें दिसतें.

वरील राज्यपद्धति उत्कृष्ट असल्यामुळें ती चिरस्थायी होईल ह्यांत शंका नाहीं. परंतु ज्यास आदि आहे त्यास अंतही आहे, ह्या तत्त्वाप्रमाणें तीही कालांतरानें नष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं. उत्कृष्ट प्रजोत्पत्तिशास्त्राचे ( Eugenics ) व कुलपरंपरेचे ( Heredity ) नियम इतके सूक्ष्म आहेत कीं, ते, मनुष्य कितीही ज्ञानी असो, त्याच्या बुद्धीच्या आटोक्याच्या बाहेर आहेत. सबब, तत्त्वज्ञानी राज्यकर्त्यांनीं ( Philosopher kings) कितीही खबरदारी घेतली तरी मधून मधून परस्पर अयोग्य अशा स्त्रीपुरुषांचा समागम झाल्याशिवाय राहाणार नाहीं व तोही यथाविधि व योग्य काळीं होणार नाहीं. त्यामुळें कनिष्ठ दर्जाची प्रजा निर्माण होत जाईल व कालांतरानें शिक्षणाची हेळसांड होईल. पुढें सोनेरी माणसें कोणतीं, रुपेरी कोणतीं व लोह-पितळेचीं कोणतीं हें जाणण्याची राज्यकर्त्यांची शक्ति नष्ट होऊन तत्त्ववेत्त्यांच्या हातांतून सत्ता नाहींशी होईल. जसी प्रजा असते तशी राष्ट्र व राज्यपद्धती हीं असतात; व प्रजेची अवनति होत गेली म्हणजे राज्यपद्धतीही अवनत झाल्याशिवाय राहात नाहीं. सबब, प्रथमतः वरील राज्यपद्धति दूषित होऊन ओजस्वी परंतु ज्ञानरहित अशा मनुष्याच्या हातांत सत्ता जाईल. त्यांना युद्धाशिवाय दुसरें कांहीं दिसणार नाहीं. व योग्य असो वा नसो, परकीय लोकांवर स्वाऱ्या करून त्यांची संपत्ति लुटून आणून आपण गब्बर व्हावें हेंच राजकर्त्यांचें उद्दिष्ट आहे असें त्यांना वाटेल. ह्या राज्यपध्दतीस ( Timocracy or Timarchy ) सांग्रामिकवैभवासक्तजनसत्ताक राज्यपद्धति म्हणतात. ह्या नंतर अधिकाधिक कनिष्ठ प्रतीच्या ज्या राज्यपद्धती आहेत त्या येणेंप्रमाणें:-
१ सधनसत्ताक राज्यपद्धति ( Oligarchy ) ह्यांत श्रीमंतांचे हातांत सर्व राज्यसत्ता असते. गरीब सर्वस्वी अधिकाररहित असतात. जो श्रीमंत तो अधिकारी हे ह्या पद्धतीचें तत्त्व होय. २ सामान्य जनसत्ताक राज्यपद्धति Democracy. श्रीमंत अधिकाऱ्यांचीं मुलें आपली सर्व संपत्ति चैनींत उधळून निर्धन बनतात.

परंतु त्यांना अधिकाराची चटक असल्यामुळें ते निर्धनांच्या सहाय्यानें राज्यकर्त्यांना पदच्युत करून सामान्य जनाची राजसत्ता स्थापित करितात. ह्या नवीन राज्यपद्धतींत सर्वच मालक व राज्यकर्ते. सर्वांचे हक्क सारखे व सर्वांची अक्कलही सारखीच. त्यामुळें कालांतरानें अनियमितता परमावधीस जाऊन कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति होऊन जिकडे तिकडे गोंधळ माजतो. ह्या गोंधळाचा फायदा घेऊन एखादा बलिष्ठ मनुष्य पुढें सरसावतो व सर्व सत्ता आपले हातांत घेऊन सर्वांवर आपला दरारा बसावा म्हणून निष्ठुरतेनें राज्य चालवितो. पुढें पुढें तो अधिकारमदानें धुंद होऊन वाटेल ती अनन्वित कृत्यें करावयास लागतो. ह्या राज्यपद्धतीस एकछत्री जुलमी राज्यपद्धति (Tyrrany) ही संज्ञा आहे.

"रिपब्लिक" ह्या ग्रंथांतील राजकीय विचारांचें दिग्दर्शन वरप्रमाणें आहे. आतां आपण ' लॉज ' ह्या ग्रंथांतील राजकीय विचार काय आहेत तें पाहूं.

पूर्वीं सांगितलें आहेच कीं, व्यवहार्य अशी उत्तम राज्यपद्धति कोणती हें दाखविण्याचा प्लेटोनें ' लॉज ' ह्या ग्रंथांत प्रयत्न केला आहे. ' रिपब्लिक ' हा ग्रंथ लिहिल्यानंतर वयमानपरत्वें प्लेटोच्या राजकिय विचारांना व्यावहारिक स्वरूप येऊं लागलें; व त्याच्या तात्त्विक विचारांप्रमाणें सिऱ्याक्यूझ येथें राज्यपद्धति स्थापन करण्याचा त्याचा प्रयत्न निष्फळ झाल्यावर तें स्वरूप अधिकच दृढ होऊं लागलें. निष्प्रतिबंध प्रजासत्ताकराज्यपद्धति सर्वोत्कृष्ट खरी; परंतु ती जगाच्या सध्यांच्या स्थितींत शक्य नसल्यामुळें शक्याशक्यतेचा विचार करून, व्यवहार्य अशी उत्तम राज्यपद्धति शोधून काढली पाहिजे, असें प्लेटोस वाटूं लागलें. निष्प्रतिबंध प्रज्ञसत्ताक राज्यपद्धति हें ध्येय होय, व तें कधींहि विसरतां कामा नये. परंतु जोंपर्यंत, त्या ध्येयाप्रमाणें राज्यपद्धति अमलांत आणण्यास परिस्थिति अनुकूल नाहीं, तोंपर्यंत राज्यकर्त्यांनीं नियमबद्ध राज्यपद्धति स्थापून आपण केवळ कायद्यांचे सेवक ( Servants of Law ) आहोंत, अशा भावना बाळगून त्यांनीं स्वतः कायद्याबरहुकूम वागावें; व प्रजा कायद्यांचें उल्लंघन करणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी. हा ' लॉज ' ह्या ग्रंथांतील मुख्य प्रतिपाद्य सिद्धांत होय.

राज्यपद्धतीचें उद्दिष्ट काय असावें ह्याबद्दल "रिपब्लिक" व "लॉज" ह्या ग्रंथांतील विचारांत फरक नाहीं. तें उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना सद्‌गुणसंपन्न करून सुखी करणें हें होय.

The object of Laws is to make those who use them happy, for all goods are derived from them. Now, goods are of two kinds: there are human and there are divine goods; and the human hang upon the divine, and the state which attains the greater, at the same time, acquires the less, or not having the greater loses both. Of the lesser goods, the first is health, the second beauty, the third strength, including swiftness in running and bodily agility generally, and the fourth is wealth. Wisdom is chief and leader of the divine class of goods, and next follows temperance; and from the union of these two with courage, spring justice; and fourth in the scale of virtue is courage. The four naturally take precedence of the other goods, and this is the order in which the legislator must place them."

(ह्याचा सारांश—कायद्याचा हेतु नागरिकांना सुखी करणें हा होय; कारण सर्व सुखाचीं साधनें कायद्यापासून उद्‌भूत होतात. सुखाचीं साधनें दोन प्रकारचीं आहेत; मानवी साधनें व दैवी साधनें. मानवी साधनें दैवी साधनांवर अवलंबून असतात; व ज्या राष्ट्रास दैवी साधनें प्राप्त झालीं आहेत, त्यास मानवी साधनें सहजच प्राप्त होतात. परंतु ज्यास दैवी साधनें प्राप्त झालेलीं नाहींत, त्यांस मानवी साधनेंही उपलब्ध होत नाहींत. मानवी साधनांत पहिलें साधन आरोग्य, दुसरें सौंदर्य, तिसरें शारीरिक बल, व चवथें संपत्ति, हें होय. दैवी साधनांत पहिलें साधन शहाणपणा, दुसरें नियमता. शहाणपण, नियमता व धैर्य ह्या तीन सद्‌गुणांपासून उत्पन्न होणारी स्वधर्म बुद्धि, हें तिसरें साधन होय, व चवथें धैर्य हें होय. दैवी साधनें मानवी साधनांपेक्षां श्रेष्ठ होत. सबब कायदेकानू करणाऱ्यांनीं कायदे करतांना दैवी साधनांकडे अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे.)

सुखाच्या साधनांत संपत्तीला प्लेटोनें अगदीं कनिष्ठ स्थान दिलें आहे, हें अलीकडे संपत्तीला व श्रीमंत लोकांना फाजील मान देणाऱ्या आपल्या लोकांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. ज्या समाजांत श्रीमंती नाहीं व दारिद्र्यही नाहीं, तो समाज उत्तम असें प्लेटोचें मत आहे. अशा समाजांतील लोक अति उदात्त तत्वांनीं प्रेरित असतात, त्यांच्यांत उद्धामपणा किंवा अन्यायबुद्धि आढळत नाहीं, व ते एकमेकांचा हेवा करीत नाहींत किंवा एकमेकांशीं भांडत नाहींत.

( The community which has neither poverty nor riches will always have the noblest principles; there is no insolence or injustice; nor again are there any contentions or envyings among them. )

राज्यव्यवस्था कशी असावी ह्याविषयीं " लॉज् " ह्या ग्रंथांत मुख्यत्वेंकरून दोन तत्त्वें प्रतिपादन केलेलीं आहेत; ( १ ) समाजांत सत्तेची परस्परविरोधी अशीं अनेक तत्त्वें आढळून येतात, त्यांचे राज्यपद्धतींत एकीकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नाहींतर राजद्रोह व वर्गावर्गांत वैमनस्य उत्पन्न होण्याचा संभव असतो. ( २ ) एकसत्ताक राज्यपद्धति व प्रजासत्ताक राज्यपद्धति यांचें संमिश्रण झालें पाहिजे. एकसत्ताकराज्यपद्धतींत राजा आपल्या प्रजेचें योग्य स्वातंत्र्य हिरावून घेऊन तिच्यावर जुलूम करितो, तर प्रजासत्ताक राज्यपद्धतींत प्रजेमध्यें मर्यादातिक्रम होऊन स्वेच्छाचार वाढतो. सबब दोन्ही राज्यपद्धतींचें संमिश्रण केलें पाहिजे. ( १ ) आईबापांची आपल्या मुलांवर सत्ता, ( २ ) उच्च वर्गाचे लोकांची कनिष्ठ वर्गांतील लोकांवर सत्ता, ( ३ ) वृद्धांची तरुणांवर सत्ता, ( ४ ) धन्याची गुलामावर सत्ता, ( ५ ) बलिष्ठांची निर्बलांवर सत्ता, ( ६ ) ज्ञान्याची अज्ञान्यांवर सत्ता, ( ७ ) सुदैवी माणसांची ( उदाहरणार्थ, योग्य नसतांनाही दैववशात् जो एखाद्या अधिकाराकरितां निवडला जातो अशांची ) दुर्दैवी माणसांवर सत्ता. अशीं हीं सात परस्परविरोधी पण नैसर्गिक अधिकाराचीं तत्त्वें होत. ह्या तत्त्वांत सहावें म्हणजे ज्ञान्यांची अज्ञान्यांवर सत्ता हें श्रेष्ठ असून वास्तविक पाहतां त्याच तत्त्वावर राज्यपद्धति उभारली पाहिजे. परंतु व्यवहारांत ह्या तत्त्वाचें वर्चस्व नसून बलिष्ठांची निर्बलांवर सत्ता हेंच तत्त्व विशेष प्रचलित आहे. तथापि, ह्या सर्व तत्त्वांचें एकीकरण करून राज्यपद्धति स्थापन केली पाहिजे. एकसत्ताक राज्यपद्धति व प्रजासत्ताक राज्यपद्धति ह्या मूल-

भूत राज्यपद्धती (Mother-polities) होत. ह्या दोन्ही पद्धतींचें योग्य संमिश्रण करून राज्यपद्धति स्थापन केली, म्हणजे प्रत्येकीपासून उत्पन्न होणारा फायदा मिळेल, परंतु प्रत्येकीपासून होणारें नुकसान टळेल. इराणांत एकसत्ताक राज्यपद्धतीचा कळस झाला म्हणून इराणी लोकांचा नाश झाला, ॲथेन्स नगरांत प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा अतिरेक झाला म्हणून ॲथीनीयन लोकांची अवनति होत चालली; सबब, एकाच्या किंवा अनेकांच्या हातांत अनियंत्रित सत्ता न देतां, ती कायद्यांनीं किंवा 'कॉन्स्टिट्यूशन'नें मर्यादित केली पाहिजे; व 'कॉन्स्टिट्यूशन' बरहुकूम राज्यकारभार चालविला पाहिजे. सारांश, सनदशीर राज्यपद्धति (Constitutional Government) स्थापून, त्या पद्धतींत एकसत्ताक राज्यपद्धति व प्रजासत्ताक राज्यपद्धति ह्या दोहोंमधील हितावह तत्त्वांचें एकीकरण झालें पाहिजे.

राजसत्ता कायद्यांनीं किंवा 'कॉन्स्टिट्यूशन' नें मर्यादित असली पाहिजे; तेव्हां, अर्थातच कायदे कसे असावेत हा प्रश्न उपस्थित होतो. त्याबद्दल प्लेटोचा मूळ सिद्धांत असा आहे कीं, कायदे करतांना राज्यकर्त्यांनीं नेहमीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, राजकारण हा विषय वादग्रस्त असून त्याबद्दल मतैक्य क्वचितच आढळतें; व देशाची नैसर्गिक परिस्थिति, लोकांच्या चालीरीती व जीवनपद्धति ह्यांचा राजकारणावर सदैव परिणाम होत असतो. कायदे करतांना व राजकीय संस्था स्थापन करतांना लोकांच्या दृढमूल झालेल्या चालीरीतींकडे दुर्लक्ष केल्यास, तात्त्विक दृष्ट्या ते कायदे व त्या संस्था कितीही उत्तम असल्या तरी त्या समाजांत चांगल्या रुजत नाहींत, व त्यामुळें त्यापासून व्हावा तसा चांगला परिणाम होत नाहीं. अतएव समाजांत ज्या कल्पना, चालीरीती व सामाजिक व धार्मिक संस्था बद्धमूल झालेल्या असतील, त्यास अनुरूप असेच कायदे स्थापित करणें इष्ट आहे.

वर सांगितलेल्या मिश्र राज्यपद्धतींत, सामान्य लोकांना राज्यकर्ते व अधिकारी निवडण्याचा हक्क असल्यामुळें त्यांना आपली जबाबदारी उत्तम रीतीनें बजावितां यावी म्हणून त्यांना चांगलें शिक्षण दिलें पाहिजे. (Those who are to elect should be trained in habits of law, and be well--educated that they may have a right judgment and may be able to select or reject men whom they approve

or disapprove, as they are worthy of either ). 'रिपब्लिक' प्रमाणेंच 'लॉज' ह्या ग्रंथांत प्लेटोनें शिक्षणाला फार महत्त्व दिलें आहे, व शिक्षणखात्याचा मुख्य अधिकारी फारच थोर योग्यतेचा असावा असें सांगितलें आहे. रिपब्लिक ग्रंथांत प्लेटोनें सामान्य लोकांना शिक्षण द्यावें किंवा नाहीं; देणें असल्यास तें कशाप्रकारचें असावें ह्यासंबंधानें कांहीं एक विवेचन केलेलें नाहीं. फक्त राज्यकर्ते किंवा राष्ट्रसंरक्षक व सहाय्यक ह्यांचें शिक्षण कसें असावें एवढेंच सांगितलें आहे. परंतु 'लॉज' ह्या ग्रंथांत सामान्य लोकांचें शिक्षणाबद्दलही प्लेटोनें विचार केलेला आहे. त्यांना निदान साधारण शिक्षण ( general education ) तरी दिलें पाहिजे असें प्लेटोचें मत आहे.

राष्ट्रविस्ताराविषयीं प्लेटोचें मत असें आहे कीं, राष्ट्र फारसें मोठें नसावें व फारसें लहानही नसावें. मोठ्या राष्ट्रांत ऐक्य राहत नसून त्याचा कारभारही सुयंत्रित रीतीनें चालविणें फार कठीण असतें. लहान राष्ट्र असल्यास त्याचें स्वातंत्र्य नष्ट होण्याची भीति असते सबब मध्यम विस्ताराचें राष्ट्र सर्वोत्कृष्ट होय. सर्व स्थावरजंगम मिळकत राष्ट्राची आहे ही भावना सर्वांच्या मनांत असली पाहिजे. परंतु 'रिपब्लिक' ह्या ग्रंथांत खाजगी मिळकतीचा प्लेटोनें ज्याप्रमाणें निषेध केलेला आहे, त्याप्रमाणें 'लॉज' ह्या ग्रंथांत केलेला नाहीं. मात्र स्थावर मिळकत सर्वांची सारखी असावी, व तीही योग्य गरजा भागविण्यास जितकी अवश्य त्यापेक्षां जास्त असूं नये. जंगम मिळकत सर्वांची सारखी असावी असा प्लेटोनें निर्बंध केलेला नाहीं. सबब, अमक्या किंमतीची जंगम मिळकत ज्यांचेजवळ आहे त्यांचा एक वर्ग, त्याचे दुप्पट किंमतीच्या जंगम मिळकतीच्या लोकांचा दुसरा वर्ग, तिप्पट किंमतीच्या जंगम मिळकतीच्या लोकांचा तिसरा वर्ग, व चौपट किंमतीच्या जंगम मिळकतीच्या लोकांचा चौथा वर्ग, असे चार वर्ग समाजांत करण्यांत यावे. हे जंगम मिळकतीच्या पायावर उभारलेले वर्ग, 'रिपब्लिक' मधील तीन वर्गांहून भिन्न होत, हें उघड आहे. प्लेटोनें जंगम मिळकतीचें जें कनिष्ठ प्रमाण धरलें आहे, त्याच्या चौपटीपर्यंत खासगी जंगम मिळकत असण्यास हरकत नाहीं. परंतु त्यापेक्षां जास्त मिळकत कोणी मिळविल्यास तिच्यावर त्याची मालकी नसून सर्व राष्ट्राची असावी. स्थावर मिळकतींत विषमता उत्पन्न होऊं नये, म्हणून तिचा क्रय, विक्रय वगैरे व्यवहार कायद्यानें निषिद्ध करावे असें प्लेटोचें मत आहे.

प्रत्येक राष्ट्रांत तीन नियामक संस्था असाव्या. त्या येणेंप्रमाणें:-- (१) राष्ट्रमंडळ ( A Council of State ) (२) सामान्यमंडळ ( General Council ) व (३) विशिष्टमंडळ. पहिल्या म्हणजे राष्ट्रमंडळांत ३७ सभासद असावे. ज्या नागरिकांनीं सैन्यांत नोकरी केलेली असेल, किंवा जे करीत असतील त्यांनीं त्यांची निवड करावी. प्रथम त्यांनीं ३०० लोक निवडावे; ह्या तीनशांतून नंतर त्यांनीं १०० निवडावे व नंतर ३७ सभासदांची जी निवड करावयाची ती ह्या शंभरांमधून करावी. ह्या मंडळांतील सभासद वयानें ५० च्या खालीं व ७० चे वर असूं नयेत; व त्यांची निवड २० वर्षेंपर्यंत असावी. एखादा सभासद निवडणुकीचे वेळीं ५० वर्षांहून अधिक वयाचा असला तर त्यानें वीस वर्षें सभासद न राहतां, आपलें सत्तरावें वर्ष पुरें झाल्याबरोबर आपल्या जागेचा राजीनामा द्यावा, व त्याचे जागीं दुसऱ्याची निवड करण्यांत यावी. हे राष्ट्रमंडळाचे ३७ सभासद कायद्याचे संरक्षक ( Guardians of the law ) होत; व त्यांचें मुख्य कर्तव्य कायद्यांची अंमलबजावणी योग्य रीतीनें होत आहे किंवा नाहीं हें पहाणें व न्यायाधीश वगैरे अधिकाऱ्यांवर देखरेख करणें हें होय.

दुसरी संस्था सामान्यमंडळ ही होय. हिचे सभासद एकंदर ३६० असावे व त्यांची निवडणूक येणेंप्रमाणें करण्यांत यावी. प्रथम, प्रत्येक वर्गांतून ३६० सभासद निवडण्यांत यावें. प्रत्येक नागरिकास मत देण्याचा अधिकार असावा. पहिल्या दोन वर्गांतून म्हणजे ज्यांची जंगम मिळकत कनिष्ठ प्रमाणाच्या अनुक्रमें चौपट व तिप्पट आहे, त्यांचे वर्गांतून ज्या ७२० लोकांची निवड व्हावयाची, त्यांची निवड करतांना प्रत्येक नागरिकानें–मग तो कोणत्याही वर्गाचा असो–आपलें मत दिलेंच पाहिजे. तिसऱ्या वर्गांतून म्हणजे ज्यांची जंगम मिळकत कनिष्ठ प्रमाणाच्या दुप्पट आहे त्यांचे वर्गांतून जी ३६० सभासदांची निवड करावयाची ती करतांना पहिल्या तीन वर्गांतील नागरिकांनीं आपलीं मतें दिलींच पाहिजे; परंतु कनिष्ठ वर्गांतील नागरिकांनीं आपलीं मतें त्यांना वाटल्यास द्यावी. तसेंच चवथें वर्गाच्या ३६० सभासदांची निवड करतांना पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील नागरिकांनीं आपली मतें दिलींच पाहिजेत, परंतु तिसऱ्या व चवथ्या वर्गांतील नागरिकांनीं तीं वाटल्यास द्यावीं. येणेंप्रमाणें प्रत्येक वर्गांतून ३६० अशा सभासदांची निवड केल्यानंतर त्या ३६० तून १८० ची निवड करावी व

ही करतांना प्रत्येक नागरिकानें-मग तो कोणत्याही वर्गाचा असो—मत दिलेंच पाहिजे. ह्या प्रत्येक वर्गांतील १८० तून ९० ची निवड करावयाची ती मताधिक्यानें न करितां ' लॉट ' नें म्हणजे सोडतीच्या तत्वावर करण्यांत यावी. ह्या एकंदर ३६० सभासदांतून ३० सभासदांची एक एक कमिटी असावी व प्रत्येक कमिटीनें एक एक महिना काम करावें. ह्या सामान्य मंडळाचें काम म्हणजे कायद्यांची अंमलबजावणी करणें व एकंदर लोकांचें वर्तनावर व व्यवहारांवर देखरेख करणें हें होय.

तिसरी संस्था विशिष्ट मंडळ ही होय. राष्ट्रमंडळांतलि ३७ सभासदांपैकीं जे १० जण सर्वांत वयानें, ज्ञानानें, अनुभवानें, आचरणानें, व कर्तृत्वानें श्रेष्ठ असतील त्यांचें हें मंडळ होय. प्रत्येक सभासदानें सर्व सभासदांना संमत असा एक तीस वर्षांचा तरुण गृहस्थ आपले बरोबर घ्यावा. असें हें दहा वृद्ध व दहा तरुण अशा वीस गृहस्थांचें मंडळ होय. ह्या मंडळाचें कर्तव्य असें कीं, त्यानें राष्ट्राचें ध्येय जें सद्गुणसंवर्धन तें सदैव डोळ्यांपुढें ठेवून नागरिकांनीं सद्गुणसंपन्न व्हावें ह्याकरितां योग्य त्या योजना अमलांत आणाव्या. तसेंच, त्यांनीं विशिष्ट प्रकारचीं धर्ममतें स्थापून तीं नागरिकांना शिकवून त्याप्रमाणें ते आपलें आचरण ठेवितील अशी व्यवस्था करावी.

ह्याशिवाय सर्व नागरिकांचें मंडळ ही चवथी संस्था होय. परंतु ह्या मंडळाचें कार्य कोणतें, व इतर मंडळांशीं त्याचा संबंध कसा असावा ह्याबद्दल प्लेटोनें कांहीं सांगितलेलें नाहीं.

येणेंप्रमाणें राज्यपद्धतीचीं तत्त्वें कोणतीं व राजकीय संस्था कोणत्या असाव्या ह्याचें विस्तारशः विवेचन केल्यावर प्लेटोनें कोणकोणते कायदे असावे हें सांगितलें आहे. परंतु त्याबद्दल येथें विचार करण्याचें कारण नाहीं. सबब, वर दिलेल्या प्लेटोच्या राजकीय विचारांची थोडीशी टिकात्मक चर्चा करून हा निबंध पुरा करूं.

प्लेटोच्या राजकीय विचारांचा विचार करितांना एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, सदरहु विचार अडीच हजार वर्षांपूर्वींचे होत. प्लेटोच्या मरणानंतर आजपर्यंत राजकीय शास्त्राची इतर शास्त्रांप्रमाणेंच बरीच प्रगति झालेली आहे. सबब, प्लेटोचे राजकीय विचार हल्लींच्या जगाच्या

स्थितीस पूर्णपणें लागू न पडल्यास त्यांत नवल नाहीं. राष्ट्राचें क्षेत्रफळ अमुक मर्यादेच्या बाहेर असूं नये, त्याची लोकसंख्याही अमुकच असावी, राजकर्त्यांना खासगी संपत्ति व कुटुंब असूं नये, स्थावर मिळकत सर्वांची सारखी असावी, इत्यादि राजकीय विचार आजपर्यंत जगाचे इतिहासांत कोठेंही अमलांत आलेले दिसत नाहींत, व पुढेंही कधीं येतील असें वाटत नाहीं. प्लेटोची राष्ट्राची कल्पना नगर-संस्थानाच्या ( City State ) पलीकडे गेलेली नसल्यामुळें व हल्लींच्या मोठमोठाल्या राष्ट्रांसारख्या किंवा साम्राज्यासारख्या राष्ट्राच्या किंवा साम्राज्याच्या राज्यपद्धतींचा विचार साहजिकपणें त्याच्या राजकीय तत्त्वमीमांसेंत न झाल्यामुळें त्याचे विचारास परिपूर्णता आलेली नाहीं. परंतु हा प्लेटोचा दोष नसून त्याच्या कालाचा होय. जी राज्यपद्धति लहानशा नगर-राष्ट्रास योग्य होईल ती अर्थातच प्रचंड राष्ट्रास-ज्यांत एकच देश नव्हे तर अनेक देशांचा अंतर्भाव झालेला आहे अशा राष्ट्रास-लागू पडणार नाहीं हें उघड आहे. लहानशा नगर-संस्थानांत सर्व नागरिकांचें मंडळ स्थापन करणें शक्य आहे; परंतु ज्या राष्ट्रांत एकच नगर नसून अनेक नगरें आहेत व ज्याचा विस्तार मोठा आहे अशा राष्ट्रांत असें मंडळ स्थापणें शक्य नाहीं. विस्तृत राष्ट्रांत असें मंडळ स्थापन करणें शक्य नाहीं. अशा राष्ट्रांत प्रतिनिधितत्वाचाच अंगिकार केला पाहिजे. तसेंच 'रिपब्लिक' ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें राज्यकर्ते खासगी बंधनापासून अगदीं अलिप्त असावेत हें जरी इष्ट आहे, तरी कुटुंब, खासगी संपत्ति इत्यादि सामाजिक संस्था इतक्या दृढमूल झाल्या आहेत कीं, त्या नष्ट करणें शक्य नाहीं; व जरी कदाचित् शक्य असलें, तरी त्या नष्ट केल्यानें समाजाची प्रगति किंवा अधोगति होईल, हा प्रश्नच आहे.

प्लेटोच्या हयातींत ॲथेन्स नगरांत प्रचलित असलेली प्रजासत्ताक राज्यपद्धति बरीच दूषित झाली होती, व त्यामुळें प्लेटोचें मत सदरहु राज्यपद्धतीच्या विरुद्ध झालें होतें, हें वर सांगितलेंच आहे. ही त्याची राज्यपद्धतीविषयीं असलेली प्रतिकूलता ' रिपब्लिक ' ग्रंथांत पूर्णपणें प्रतिबिंबित झालेली आहे. सदरहु ग्रंथांत वर्णन केलेल्या मनोमय ( ideal ) राज्यपद्धतींत सामान्य लोकांना बिलकूल थारा नाहीं. त्यांनीं आपाआपलें उद्योगधंदे योग्य रीतीनें करावें, व राष्ट्रसंरक्षक सांगतील त्याप्रमाणें वागावे, ह्यापलीकडे त्यांचें कर्तव्य नाहीं. परंतु ह्या बाबतींत प्लेटोच्या मनांत झालेला फरक लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

सामान्य लोकांनींही राजकारणांत यथामति लक्ष्य घातलें पाहिजे व त्यांना निवडणुकीचा हक्क दिला पाहिजे, हा प्लेटोच्या विचारांत झालेला फरक त्याच्या लॉज ग्रंथांत व्यक्त झालेला आहे. राजकिय बुद्धि (Political sense) फक्त विशिष्ट लोकांनाच परमेश्वरानें दिली आहे, सामान्य लोकांना त्या बुद्धीचा गंधही नाहीं, असें प्रथम प्लेटोचें मत होतें; परंतु ही आपली चूक आहे व खरोखर पहातां राजकीय बुद्धि सर्वांचेच ठिकाणीं कमीजास्त प्रमाणानें आढळून येते, असें त्यास पुढें वाटूं लागलें. व म्हणून राज्यपद्धति कायद्यांनीं बद्ध असून कायदे करणारी वगैरे जीं राष्ट्रांतील मंडळें त्यांतील सभासद निवडण्याचा हक्क इतर लोकांप्रमाणें सामान्य लोकांनाही देण्यांत यावा, असें मत त्यानें 'लॉज' ह्या ग्रंथांत प्रतिपादन केलें. प्रत्येक राष्ट्रास कॉन्स्टिट्यूशन ( Constitution ) असावी, व त्यांत ग्रथित केलेल्या मूलभूत नियमान्वयें राज्यकारभार चालवावा, तसेंच प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क सर्व वर्गांचे लोकांना असावा—हीं प्लेटोचीं दोन्हीं तत्त्वें अर्वाचीन सुधारलेल्या राष्ट्रांच्या राज्यपद्धतींत पूर्णपणें आढळून येतात हें वाचकांस सांगावयास नकोच. प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति आज जगांतील बहुतेक राष्ट्रांत प्रचलित आहे,व ज्या देशांत ती प्रचलित नाहीं तेथेंही ती कालांतरानें स्थापन झाल्याशिवाय राहणार नाहीं,अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. तथापि, अद्यापही सदरहु राज्यपद्धतीच्या योग्यतेबद्दल शंका घेणारे टीकाकार नाहींत असें नाहीं. प्लेटोनें 'रिपब्लिक' मध्यें मनोरथ राज्यपद्धतीचें रेखाटलेलें चित्र इतकें हृदयंगम आहे कीं, त्यानें मोहित होऊन, अशिक्षित, तत्वहीन व चंचल वृत्तीच्या अशा सामान्य लोकांच्या हातांत निवडणुकीसारखा महत्त्वाचा अधिकार दिल्यानें राज्यकारभारांत अव्यवस्थितपणा माजून राष्ट्राचें सरतेशेवटीं अहित झाल्याशिवाय राहणार नाहीं असें म्हणणारे टीकाकार अद्याप आहेत! परंतु खुद्द प्लेटोस रिपब्लिकमध्यें व्यक्त केलेले कांहीं विचार निदान अव्यवहार्य म्हणून सोडून द्यावे लागले व सरतेशेवटीं प्रतिनिधितत्व मान्य करावें लागलें ही गोष्ट हे टीकाकार विसरतात. असो; ह्या प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीसंबंधानें लॉर्ड मॉर्लेसाहेबांनीं आपल्या ह्या निबंधाच्या आरंभीं सांगितलेल्या ग्रंथांत व्यक्त केलेले विचार येथें नमूद केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. लॉर्ड मॉर्लेसाहेब म्हणतातः—

"Representative Government exists today in a hundred different forms, depending on a hundred differences

in social state and history, and nobody claims for public opinion in all or any of them either sanctity or infallibility. But to make a mock of it, is merely to quarrel with human life. We all know the shortcomings in political opinion and character; the fatal contentment with simple answers to complex questions; the readiness as Hobbes put it, to turn against reason, if reason is against you; violent overestimate of petty things; vehement agitation one day, reaction as vehement the other way the next; money freely laid on a flashing favourite this week, deep curses on what has proved the wrong horse the week after; haste; moral cowardice; futility. But if anybody supposes that these mischiefs are peculiar to parliaments or democracy, he must be strangely ill-read in the annals of military despotism, absolute personal power, centralized bureaucracy, exalted ceremonial court "

( ह्याचा सारांशः—राष्ट्राष्ट्रांच्या सामाजिक स्थितींत व ऐतिहासिक परंपरेंत जे शेंकडों फरक आहेत, त्यामुळें प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीचीं शेंकडों स्वरूपें आज आढळून येतात; व ह्या भिन्नभिन्न स्वरूपांच्या प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतींतील लोकमत सर्वथैव प्रमादरहित किंवा पूज्य असतें, असें कोणाचेंही म्हणणें नाहीं. परंतु तितक्यावरून सदरहु राज्यपद्धतीची चेष्टा करणें म्हणजे मानवी जीविताशीं निष्कारण कलह करणें होय. विषयाच्या काठिण्याकडे किंवा गुंतागुंतीकडे लक्ष न देतां ते साध्या रीतीनें सोडविण्याची विनाशक प्रवृत्ति; सदसद्विवेकबुद्धि आपलें मताच्या विरुद्ध असल्यास त्या बुद्धीच्याच विरुद्ध जाण्याची तत्परता; अगदीं क्षुद्र गोष्टीस फाजिल महत्त्व देणें; आज अतिशय उत्साह तर उद्यां अतिशय निरुत्साह; एखाद्या आवडत्या गोष्टीबद्दल आज पाण्याप्रमाणें पैसा खर्च करण्याची तयारी, तर लगेच दुसरे दिवशीं ती गोष्ट मनासारखी घडून न आल्यामुळें तीस शिव्याशाप देण्याची तत्परता; उतावळिपणा; नैतिक भित्रेपणा इत्यादि राजकीय लोकमतांत व लोकवर्तनांत दिसून येणारे दोष कोणास माहीत नाहींत असें नाहीं. परंतु हे दोष केवळ पार्लमेंटांत किंवा प्रतिनिधिसत्ताक राज्यप-

द्धतींतच आढळतात, अन्य राज्यपद्धतींत आढळत नाहींत, अशी जर कोणाची समजूत असेल तर त्यास एकसत्तात्मक, विशिष्टजनसत्तात्मक वगैरे राज्यपद्धतींच्या इतिहासांचें ज्ञान नाहीं असेंच म्हणणें भाग आहे. )

तसेंच, सर्व सत्ता विशिष्ट अधिकारी वर्गाचे हातांत आहे व त्यांच्यावर लोकमताचा दाब नाहीं अशी स्थिति असली म्हणजे काय परिणाम होतो, त्याबद्दलही लॉर्ड मॉर्ले साहेबांचे विचार मनन करण्यासारखे आहेत. ते म्हणतातः—

" Bureaucracy has not to persuade, to compromise, to give and take, to prove and win its case in face of rival ideas and antogonistic interests. Relieved from these wholesome exigencies, it may carry and enforce measures efficiently, but with too little security that time will prove them right. And who that has watched bureaucracy at close quarters, will deny that it is in fact more cumbrous, dilatory and depressing for a people's political energy–and not any less so to those who work it, than that discussion in a representative assembly which is the salutary substitute. "

( सर्व सत्ता अधिकारी वर्गाचे हातांत असल्यास, त्यांस इतरांचें मन वळविण्याचें, तडजोड करण्याचें किंवा भिन्न मतांच्या व विचारांच्या लोकांशीं उघडपणें वादविवाद करून आपलें मत स्थापन करण्याचें कारण पडत नाहीं. त्याचा परिणाम असा होतो कीं, जरी सदरहु वर्गाचे हातून राज्यकारभारासंबंधाच्या योजना उत्तम रीतीनें अमलांत आल्या तरी त्या योजना कालांतरानें खऱ्या व योग्य ठरतीलच असा नेम नाहीं. व ज्यास अशा अधिकारी वर्गाचा प्रत्यक्ष अनुभव आहे, त्यास हें कबूल करणें भाग आहे कीं, प्रतिनिधिमंडळांतील वादविवादपद्धतीपेक्षां त्या वर्गाची राज्यकारभारपद्धति अधिक अवजड व दिरंगाईची असते; इतकेंच नव्हे, तर लोकांची व खुद्द सदरहु अधिकारीवर्गाची राजकीय उमेद तीमुळें क्षीण होत जाते. ) प्लेटोसारख्या तत्त्ववेत्त्यास प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति प्रथम नापसंत असावी, परंतु विचारांतीं व अनुभवांतीं त्यास ती अभिमत व्हावी, ही गोष्ट सदरहु राज्यपद्धतीच्या आक्षेपकांनीं विचार करण्यासारखी आहे.

शिक्षणाबद्दल व स्त्रियांचे योग्यतेबद्दल प्लेटोचे विचार अत्यंत मननीय आहेत. सर्वांना निदान सामान्य प्रतीचें शिक्षण दिलें पाहिजे, व सामान्य लोकांनीं आपलीं नागरिकत्वाचीं कर्तव्यें चांगल्या रीतीनें करावीं म्हणून त्यांस चांगलें राजकीय शिक्षणही दिलें पाहिजे, ह्या प्लेटोच्या सिद्धांताबद्दल आतां मतभेद होणें शक्य नाहीं. स्त्रियांच्या योग्यतेविषयीं त्याचे विचार इतके उदात्त व पुरोगामी आहेत कीं, मताभिलाषी स्त्रियांची किंवा त्यांच्या पुरस्कर्त्यांचीही तेथपर्यंत मजल गेलेली नाहीं. स्त्रीपुरुषांमध्यें वास्तविक भिन्नता नाहीं; त्यांचे गुणधर्म व त्यांचीं कार्यें पुरुषांच्या गुणधर्मांहून व कार्यांहून भिन्न आहेत ही कल्पना निसर्गास धरून नसून वस्तुतः त्याविरुद्ध आहे; इत्यादि प्लेटोचे विचार अतिशय मार्मिक असून मननीय आहेत. तसेंच राज्यपद्धति कोणत्याही प्रकारची असो, राज्यकारभार ज्ञानाच्या भक्कम पायावर उभारला पाहिजे हेंही तत्त्व फारच महत्त्वाचें आहे. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे पाश्चात्य देशांतील हल्लींचे राजकीय तत्त्ववेत्तेही हेंच सांगत आहेत. राज्यकर्त्यांना संकलित ज्ञानाची अवश्यकता नाहीं, त्यांचे ठिकाणीं व्यावहारिक क्षमता ( Practical ability ) असली म्हणजे पुरें आहे हें तत्व घातुक आहे, असा हे तत्ववेत्तें आक्रोश करीत असून ज्याचे हातांत राजसत्ता आहे किंवा ज्यांच्यावर, राज्यकारभार चांगले रीतीनें चालला आहे किंवा नाहीं हें पाहण्याची, जबाबदारी आहे, त्यांनीं राजकीय शास्त्राचें व त्याच्याशीं ज्यांचा निकट संबंध येत आहे अशा इतर शास्त्रांचें ज्ञान संपादन केलें पाहिजे, असें ते निक्षून सांगत आहेत. ह्या राजकीय ज्ञानाची आपल्या हिंदुस्थानांत किती अवश्यकता आहे हें सांगण्याचें कारण नाहीं.

प्लेटोच्या कालांत नीतिशास्त्र ( Ethics ) व राजकीय शास्त्र ( Political science ) ह्यांची फारकत झालेली नव्हती. शास्त्रांच्या व्यवस्थित अध्ययनाकरितां अशी शास्त्रा-शास्त्रांत फारकत करणें कितीही अवश्य असलें तरी त्यापासून एक मोठा तोटा होण्याचा संभव असतो. तो हा कीं, मनुष्य किंवा मनुष्यसमाज ह्यांचा जो व्यापक बुद्धीनें विचार व्हावयास पाहिजे तो होत नाहीं, व मनुष्याच्या किंवा समाजाच्या एखाद्या विशिष्ट अंगास फाजिल महत्त्व मिळतें. सद्‌गुणांचें संवर्धन करणें हें सरकाराचें प्रत्यक्ष कर्तव्य असो किंवा नसो, सद्‌गुणसंवर्धनाशिवाय सुखसंवर्धन होणें शक्य नाहीं, हें तत्व राज्यकर्त्यांनीं कधींही विसरतां कामा नये. सरकार ही एक प्रचंड शक्ति आहे

वे ती जरी समाजापासूनच उत्पन्न झालेली असली, तरी तिचा समाजावर इतका प्रचंड आघात होत असतो कीं, सद्गुणपोषणाचें काम आमचें नाहीं, तें समाजाचें आहे, असें सरकारास म्हणून चालावयाचें नाहीं. व्यक्तिविषयक योग्य स्वातंत्र्यास आळा न घालतां सद्गुणसंवर्धनाचें कार्य प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें जितकें करतां येण्यासारखें आहे, तितकें सरकारनें केलेंच पाहिजे. प्रजेस सद्गुणसंपन्न करणें हें शासनपद्धतीचें अंतिम ध्येय किंवा कार्य होय, ह्या प्लेटोच्या तत्त्वाकडे अशा दृष्टीनें पाहिल्यास, त्यांत जरी शास्त्र-मिश्रणाचा दोष असला तरी त्यांत व्यापक निरीक्षणाचा गुण असून अन्य रीती-नेंही तें योग्य आहे. राजकारण हें शास्त्र आहे, व सद्गुणाशिवाय प्रजा सुखी होणें शक्य नाहीं, हीं दोन्ही तत्त्वें, मुत्सद्दी, अधिकारी व राजकीय पुढारी जितक्या प्रमाणानें लक्षांत ठेवतील तितक्या प्रमाणानें समाजाचा फायदाच होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.


समाप्त

REFBK-0004083